cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२७९ | शुक्रवार दि.६ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### बेजबाबदार सरकारने न्यायालाचे निर्देश तरी पाळावेत

देशातील सर्व शाळांमध्ये मुलींना नैसर्गिकरीत्या नष्ट होणारे (ऑक्सो बायोडिग्रेडेबल सॅनिटरी नॅपकिन्स) मोफत पुरवण्याचे आणि मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधावीत असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले. हे आदेश न पाळणाऱ्या खासगी शाळांची मान्यता रद्द केली जाईल आणि सरकारी शाळा संदर्भात राज्य सरकारला जबाबदार धरले जाईल, अशी तंबीही न्यायालयाने दिली.

# भारत-अमेरिका करारावरून शेतकरी आक्रमक

## २०२०-२१ च्या शेतकरी आंदोलनाची पुनरावृत्ती करण्याचा दिला इशार

दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत-अमेरिका व्यापार करारावरून शेतकरी संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. जर या द्विपक्षीय करारात कोणत्याही शेती अथवा दुग्धजन्य उत्पादनाचा समावेश केल्यास २०२०-२१ च्या शेतकरी आंदोलनाची पुनरावृत्ती होईल, असा इशारा विविध शेतकरी संघटनांचे नेतृत्त्व करणाऱ्या संयुक्त किसान मोर्चाने दिला आहे.**



अमेरिकेत जवळपास आठ लाख शेतकरी आहेत. त्यांना त्यांच्या सरकारकडून मोठ्या प्रमाणावर अनुदान दिले जाते. तर भारतात कोट्यवधी शेतकरी आहेत. किमान आधारभूत किमतीसाठी कायदेशीर हमी देणारा कायदा आणावा, अशी आमची मागणी आह. जर अमेरिकेतील शेती उत्पादने आपल्या देशात आली तर आपला शेतकरी उद्ध्वस्त होईल, अशी चिंता एसकेएमचे ज्येष्ठ नेते आणि अखिल भारतीय किसान फेडरेशनचे अध्यक्ष प्रेम सिंग भांगू यांनी व्यक्त केली आहे. भारतातील शेती आणि दुग्धजन्य सारख्या संवेदनशील क्षेत्रांना या करारातून वगळण्यात आल्याचा दावा केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांनी केला आहे. पण त्यांचा हा दावा अमेरिकेच्या कृषिमंत्री ब्रूक रोलिन्स यांनी केलेल्या दाव्याच्या परस्परविरोधी आहे. रोलिन्स यांच्या मते, या करारानुसार, अमेरिका भारतातील मोठ्या बाजारपेठेत अधिक प्रमाणात अमेरिकेतील शेती उत्पादने निर्यात करेल. यामुळे अमेरिकेची भारतासोबतची १.३ अब्ज डॉलर्सची शेती व्यापार तूट कमी होईल, असे सांगण्यात आले आहे. तरीही वाणिज्य मंत्री गोयल यांनी रोलिन्स यांच्या दाव्याशी असहमती दर्शवलेली नाही. यामुळे गोयल यांचे विधान शेतकऱ्यांची दिशाभूल करणारे आहे. म्हणूनच त्यांना संवैधानिक पदावर कायम राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही, अशा शब्दांत संयुक्त ▶▶ पान २ वर

## धन्या ...परळीचं खरखटं....म्हणत मनोज जरांगेंनी पुन्हा वाद वाढवला

जालना । प्रतिनिधी

**परळीचं खरखटं गप्प बसणार नाही, जामीन झालं की पुन्हा पुन्हा तो कट रचणार, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली. हे सगळं घडवून आणतो तो धन्याच आहे, असं म्हणत जरांगे पाटील यांनी आमदार धनंजय मुंडेंवर टीका केली. गेली अनेक दिवस शांत असलेले वातावरण पुन्हा सोशल मिडयाच्या माध्यमातून दोन समाजात दुही निर्माण करणारे ठरत आहे.**



मनोज जरांगे पाटील यांची नार्को टेस्टसह एसआयटी चौकशी करावी अशी मागणी, जरांगेंच्या घातपाताचा आरोप असलेल्या अमोल खुणे यांनी केली आहे. ते मनोज जरांगे यांचे जुने सहकारी देखील होते. या मागणीचे निवेदन त्यांनी पोलीस अधीक्षकांना दिले असून, अमोल खुणे यांनी मनोज जरांगे यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. यावर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. बोलताना ते म्हणाले की, अमोल खुणेच्या अर्जाची अंमलबजावणी करा. ▶▶ पान २ वर

## २१ वर्षाची पुनरावृत्ती; पंतप्रधानांच्या भाषणाशिवाय आभार प्रस्ताव संमत

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**लोकसभेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा आभार प्रस्ताव संयुक्त संसदेच्या अर्थसंकल्पीय सत्रात पास करण्यात आला. मात्र यंदाचा आभार प्रस्ताव हा ऐतिहासिक ठरला. तब्बल २१ वर्षानंतर पंतप्रधानांच्या भाषणाशिवाय हा प्रस्ताव लोकसभेत पास करण्यात आला होता. यापूर्वी २००४ मध्ये राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर तत्कालीन पंतप्रधानांना भाषण करता आले नव्हते.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी राष्ट्रपतींच्या अभिभाषणार आभार प्रस्तावावेळी भाषण करणं अपेक्षित होते. मात्र विरोधी पक्षाच्या ▶▶ पान २ वर

## तांत्रीक समस्येसह मानवी चुकीमुळे विमानाचा अपघात!

### दिवंगत नेते अजित पवारांच्या विमान अपघाताचा प्राथमिक चौकशी अहवाल समोर

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनास कारणीभूत ठरलेल्या बारामती येथील विमान अपघाताचा प्राथमिक चौकशी अहवाल अखेर सादर करण्यात आला आहे. या अहवालानुसार, हा अपघात केवळ एका तांत्रिक बिघाडामुळे झाला नसून, तो मानवी त्रुटी आणि तांत्रिक समस्यांच्या दुर्दैवी साखळीचा परिणाम असल्याचे समोर आले आहे. प्रामुख्याने लँडिंगच्या वेळी वैमानिकाला धावपट्टीच्या अंतराचा आणि



स्थितीचा अचूक अंदाज न आल्याने विमानाचा समतोल बिघडल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. ▶▶ पान २ वर


## राज्यातील शाळांमध्ये असुविधांचा बाजार

● शिक्षण विभागाच्या सांख्यिकी अहवालातून धक्कादायक माहिती समोर

● १,१६४ शाळांत मुलींसाठी प्रसाधनगृहेच नाहीत; हजारो शाळा अंधारात

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेचे धक्कादायक वास्तव समोर आले असून, तब्बल १,१६४ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय नसल्याचे उघडकीस आले आहे. तर ३,३२८ शाळांमध्ये अद्याप वीज सुविधा उपलब्ध नसल्याचे भीषण वास्तव शिक्षण विभागाच्या २०२४ ते २०२६ या कालावधीतील सांख्यिकी



अहवालातून उजेडात आले आहे. मुंबई, गोंदिया, कोल्हापूर, सातारा आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये मात्र मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची शंभर टक्के सुविधा आहे. ▶▶ पान २ वर

### सर्वाधीक शाळा बीड जिल्ह्यात

मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या सर्वाधिक ११२ शाळा बीड जिल्ह्यात आहेत. हिंगोली, नांदेड, परभणी, गडचिरोली, जळगाव, अमरावती, नाशिक आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये ५० ते १०० शाळांमध्ये ही सुविधा नाही. तर २० जिल्ह्यांमध्ये ५० पेक्षा कमी शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसल्याचे अहवालात म्हटले आहे.

## शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून प्रदर्शनाची तयारी करा-मंत्री पंकजा मुंडे

### परळीतील महापशुधन एक्स्पोच्या तयारीचा घेतला आढावा



मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्या दृष्टिने प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.**

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या तयारीचा पशुसंवर्धन ▶▶ पान २ वर

### महिला, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वेळ

महिला व विद्यार्थ्यांना पशुप्रदर्शन पाहण्यासाठी दुपारच्या वेळी विशेष वेळ ठेवण्यात यावा. तसेच राज्यातील पशुवैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी, शेतकरी यांनाही निमंत्रित करण्यात यावे. राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनाही निमंत्रित करण्यात यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. या प्रदर्शनास राज्यातील शेतकरी, पशुपालक, पशुवैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यार्थी यांनीही उपस्थित रहावे, असे आवाहन पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी यावेळी केले.

## लातूरच्या महापौरपदासाठी काँग्रेसच्यावतीने जयश्री सोनकांबळे

लातूर । प्रतिनिधी

राज्याचे लक्ष लागलेल्या लातूर महापालिकेचा गड राखण्यात काँग्रेसला यश आले असून, आता महापौर आणि उपमहापौर कोण होणार याची उत्सुकता सर्वांना होती. अखेर, बहुमताच्या जोरावर काँग्रेसच महापौर पदासाठी दावेदार असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानुसार, काँग्रेसकडून लातूर महानगरपालिकेच्या महापौरपदी जयश्री सोनकांबळे आणि उपमहापौरपदी ॲड. स्नेहल उटगे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. दोन्ही पदांसाठी इतर कोणतेही दावेदार नसल्याने निकाल स्पष्ट झाला असून, लवकरच दोघेही अनुक्रमे महापौर आणि उपमहापौरपदी विराजमान होणार आहेत.

लातूर महानगरपालिकेतील १८ प्रभागांमधील ७० जागांपैकी काँग्रेस पक्षाने ४३ जागांवर विजय मिळवत निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे. वंचित बहुजन आघाडीने ४ जागांवर यश मिळवले असून, काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी मिळून एकूण ४७ जागा त्यांच्या ताब्यात आहेत. त्यामुळे महापालिकेवर काँग्रेस-वंचित आघाडीचे वर्चस्व स्पष्ट झाले आहे. ▶▶ पान २ वर

## लाडक्या बहिणींना एकत्रित ४५०० रुपये मिळणार

पुणे । प्रतिनिधी



राज्यातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. तांत्रिक कारणांमुळे ज्या महिलांचे हप्ते रखडले होते, त्यांना आता नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यांचे एकूण ४५०० रुपये एकत्रित मिळणार आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथील प्रचारसभेत ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.

अनेक महिलांना ई-केवायसी प्रक्रियेतील त्रुटींमुळे गेल्या तीन महिन्यांपासून योजनेचा ▶▶ पान २ वर

## कर्जत येथे राज्यस्तरीय पत्रकार संघ पुरस्कार सोहळा

### अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचा मेळावा; राज्यातील जिल्हा व तालुका पत्रकार संघांचा होणार सन्मान

पुणे । प्रतिनिधी

**अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने राज्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा व तालुका पत्रकार संघांचा गौरव करण्यासाठी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे आयोजित करण्यात आला आहे. येत्या रविवारी, २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता कर्जत येथील रॉयल गार्डन येथे हा भव्य कार्यक्रम पार पडणार असून, या सोहळ्यास महाराष्ट्रातील सर्व पत्रकार बंधूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,** असे आवाहन करण्यात आले आहे.



अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणारे 'पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ' आणि 'वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ' हे प्रतिष्ठेचे राज्यस्तरीय पुरस्कार या वेळी प्रदान करण्यात येणार आहेत. यासोबतच राज्यातील तालुका अध्यक्षांचा मेळावाही याच ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक तालुका पत्रकार संघ केवळ पत्रकारितेपुरते मर्यादित न राहता सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### मनरेगा योजना लागू करा; केरळ विधानसभेत ठराव

तिरूअनंतपूरमः दक्षिण भारतातील कर्नाटक, तामिळनाडू आणि तेलंगणा पाठोपाठ केरळ विधानसभेनेही विकसित भारत रोजगार व आजीविका अभियान-ग्रामीण व्हीबी-जी राम जी कायदा रद्द करण्याचा ठराव गुरुवारी (दि.५) विधानसभेत मंजूर केला आहे. केंद्र सरकारने व्हीबी-जी राम जी हा नवा कायदा मागे घ्यावा आणि जुनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) पुन्हा लागू करावी, अशी मागणी या ठरावात करण्यात आली आहे. हा ठराव केरळचे संसदीय कामकाज मंत्री एम बी राजेश यांनी मांडला. त्यामुळे केंद्र सरकार विरुद्ध केरळ राज्य सरकार असा राजकीय वाद निर्माण होण्याची चिन्हं दिसू लागली आहेत. ठराव सादर करताना एम. बी. राजेश म्हणाले की, ''मनरेगा ही पूर्णपणे केंद्र सरकार पुरस्कृत योजना होती. मात्र नव्या व्हीबी-जी राम जी योजनेत ४० टक्के खर्च राज्यांना करावा लागणार आहे. त्यामुळे राज्यांच्या तिजोरीवर मोठा आर्थिक ताण येणार आहे, असा दावा त्यांनी केला.

### रॅगिंगला कंटाळून विद्यार्थ्याची आत्महत्या

इंदूरः येथील शासकीय महात्मा गांधी स्मृती वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएसच्या प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अंतरिक्ष अग्रवाल असे या विद्यार्थ्याचे नाव असून, तो ग्वाल्हेरचा रहिवासी होता. त्याचा मृतदेह वसतिगृहातील खोलीत पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला. याप्रकरणी आता त्याच्या कुटुंबीयांनी महाविद्यालयातील वरिष्ठ विद्यार्थ्यांवर रॅगिंग आणि छळाचे आरोप करत सखोल चौकशीची मागणी केली आहे. महाविद्यालयातील रॅगिंगमुळे अंतरिक्ष पूर्णपणे खचला होता. त्यांनी त्याला परिस्थितीशी जुळवून घेण्याचा सल्ला दिला होता, मात्र तो इतक्या टोकाच्या नैराश्यात जाईल याची पुसटशी कल्पनाही आपल्याला नव्हती, असे त्याच्या वडिलांनी सांगितले.

### नवी मुंबईच्या महापौरपदी सुजाता पाटील यांची निवड

पनवेलः भाजपच्या सुजाता पाटील आणि दशरथ भगत यांची अनुक्रमे नवी मुंबई महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौरपदी निवड झाली आहे. सरोज रोहिदास पाटील यांनी महापौरपदासाठीचा अर्ज मागे घेतल्याने आणि आकाश बाळकृष्ण माधवी यांनी उपमहापौरपदाच्या शर्यतीतून माघार घेतल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. यापूर्वी नगरसेविका आणि महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षा म्हणून काम केलेल्या सुजाता पाटील यांनी पक्षाच्या नेतृत्वाचे आभार मानले. स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि वाहतूक नियोजन हे आपले मुख्य प्राधान्यक्रम राहतील, असे त्यांनी सांगितले. १११ नगरसेवक असलेल्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने ६५ आणि शिवसेनेने ४३ जागा जिंकल्या होत्या. खासदार संजीव नाईक म्हणाले, प्रचारादरम्यान भाजप आणि शिवसेना यांच्यात निर्माण झालेले मतभेद आता संपुष्टात आले आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.५ फेब्रुवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३३.५० क्विंटल | २,३०० | २,९७१ | २,५२७ |
| ज्वारी/हायब्रिड: ८०.५० क्विंटल | १,७०१ | ४,५०० | ३,०५६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : २११.५० क्विंटल | ७,००० | ८४,००१ | ९,८५६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| बाजरी: १७.०० क्विंटल | २,४०० | ३,३०० | २,८३६ |
| मुग: २.०० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीन: ३१.०० क्विंटल | ५,६५० | ५,६५० | ५,६५० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

cmyk

अग्रलेख

# बेजबाबदार सरकारने न्यायालाचे निर्देश तरी पाळावेत

देशातील सर्व शाळांमध्ये मुलींना नैसर्गिकरीत्या नष्ट होणारे (ऑक्सो बायोडिग्रेडेबल सॅनिटरी नॅपकिन्स) मोफत पुरवण्याचे आणि मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधावीत असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले. हे आदेश न पाळणाऱ्या खासगी शाळांची मान्यता रद्द केली जाईल आणि सरकारी शाळा संदर्भात राज्य सरकारला जबाबदार धरले जाईल, अशी तंबीही न्यायालयाने दिली. याचाच अर्थ इतक्या सामान्य सुविधादेखील सरकारे अद्यापपर्यंत उपलब्ध करून देऊ शकलेली नाहीत, हा निर्णय कठोरपणे अंमलात आला तर मासिक पाळी येणाऱ्या मुलींचा, विशेषतः ग्रामीण भागातील मुलींचा फार मोठा ताण कमी होऊ शकेल, केवळ उपरोक्त सुविधा नसल्याने त्या पाच दिवसांचा विलक्षण ताण शाळेत जाणाऱ्या मुलींना सहन करावा लागतो हे वास्तव आहे. या सगळ्या ताणात मासिक पाळीशी संबंधित गैरसमज आणि अज्ञान भर घालते, वास्तविक, मासिक धर्म हा प्रजननाचे चक्र सुरु ठेवतो. तरीही त्यावर जाहीर चर्चा होत नाही.

महिला मोकळेपणे संवाद साधत नाहीत, तो चर्चेचा विषय आहे हे तरी किती महिलांना मान्य असते? त्यात काय बोलायचे. असाच दृष्टिकोन मुरलेला आढळतो. त्यामुळे मासिक पाळीशी समस्या, मानसिक ताणतणाव, भावनांची आंदोलने असे अनेक मुद्दे दुर्लक्षित राहतात किंवा समाजमान्य नसतात. 'चालायचेच ही वृत्ती इथेही आढळते. मासिक पाळी आणि विद्यार्थिनी यासंदर्भात विविध सर्वेक्षणे सातत्याने केली जात असतात. ती करणाऱ्या संस्थांची नावे भिन्न असली तरी दोन निष्कर्ष मात्र सारखेच आढळतात. ती म्हणजे, मासिक पाळीच्या किमान पाच दिवस मुली शाळेत गैरहजर राहतात आणि दुर्गम अतिदुर्गम भागातील अनेक मुली शाळा सोडून देतात. एकविसाव्या शतकातही या कारणासाठी मुली त्यांच्या इच्छेविरुद्ध शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर फेकल्या जाणे हा सरकारांचा नाकर्तेपणा आणि त्यांच्या बाईपणाची शोकांतिका आहे.


बहुसंख्य शाळांमध्ये स्वच्छतागृहे असल्याचा दावा सरकार करते. पण त्यांची स्वच्छता ही गंभीर समस्या आहे आणि न्यायालयाने तर मासिक धर्माचे स्वच्छ आणि सुरक्षित व्यवस्थापन हा मुलींचा अधिकार मानला आहे. तो त्यांना मिळावा यासाठी सरकारांना बजावले आहे. तथापि, नॅपकिन्स मोफत पुरवणे हा त्या अधिकाराचा एक भाग ठरू शकेल, मुलींना निसर्गतः नष्ट होणारे नॅपकिन्स पुरवायला सांगितले आहेत. पण नॅपकिन्स कोणत्याही प्रकारचे असले तरी ते वापरण्याची आणि फेकण्याची एक शास्त्रीय पद्धत आहे. ती किती मुलींना ठाऊक असू शकेल? नॅपकिन्स पुरवताना ती माहितीदेखील दिली जाणे तितकेच गरजेचे आहे. अन्यथा एरवीही सॅनिटरी नॅपकिन्सचा कचरा ही पर्यावरण प्रदूषण करणारी वेगळी गंभीर समस्या आहे. शहरी भागातील मुलींना देखील वापर झालेले नॅपकिन्स फेकायचे कसे, फेकताना कोणती काळजी घ्यायची याची किमान माहिती नसल्याचे आढळते. त्यामुळे ते तसेच इतरत्र किंवा घंटागाडीत फेकले जाताना आढळतात. तो कचरा रस्त्यांवर पसरलेला आढळतो. गटारे तुंबतात. पाणी प्रदूषित होते. कचरावेचकांच्या अनारोग्याचे कारण बनू शकतात. त्यामुळे त्याच्या वापराबरोबरच त्यांच्या फेकण्या बाबतीतही जागरुकता करणे अत्यावश्यक ठरेल. अन्यथा 'रोगापेक्षा इलाज भयंकर ठरण्याचा धोका नाकारला जाऊ शकेल का?

सॅनिटरी नॅपकिन्सची ठोस विल्हेवाट लावण्यासाठी सरकारांनी व्यवस्था करावी हा याचिकेचा मुद्दा बनतो, सामाजिक कार्यकर्त्या न्यायालयाचे दरवाजे ठोठावतात.. कचरावेचक तक्रारी करतात. शाळा किंवा महाविद्यालयांमध्ये अनेक सामाजिक संस्था नॅपकिन पुरवणारी यंत्रणा बसवतात. त्याबरोबरीने ते नष्ट करणारी व्यवस्था निर्माणाबाबत विचार झालेला आढळत नाही अशी तक्रार कार्यकर्ते करतात. त्यामुळेच वापरलेल्या नॅपकिन्सच्या ढिगाऱ्यांचे काय करायचे हा प्रश्न संबंधित यंत्रणांनादेखील सतावत असणार. पण निसर्गत नष्ट होणारे नॅपकिन्स पुरवण्याचे निर्देश आहेत. त्यामुळे त्या ढिगाऱ्यांमध्ये भर पडणार नाही अशी अपेक्षा करावी का? तथापि, सरकारे हा निर्णय अंमलात आणतील का? तशी इच्छाशक्ती दाखवतील का, हाही कळीचा मुद्दा ठरावा. कारण न्यायसंस्था असे जनहिताचे अनेक निर्णय अधूनमधून देते. पण त्या निर्णयांना कात्रजचा घाट दाखवण्यात सरकारे वाकबगार बनली आहेत. उदाहरणार्थ, चारचाकी वाहनांच्या काचांवर काळी फिल्म लावणे बेकायदेशीर आहे. त्याची कसोशीने अंमलबजावणी होते असे सरकार ठामपणे होताना दिसत नाही. याआधीही राज्यात मुलींना मोफत नॅपकिन्स पुरवणारी योजना राबवली गेली होती. तिचे पुढे काय झाले? निदान उपरोक्त निर्णय तरी दुर्लक्षिला जाऊ नये अशीच सर्वांची इच्छा असणार.

## राजकारण नाटक होत चाललंय का?

**खरंतर अलीकडे राजकारणाकडे पाहिलं की ते लोकसेवेचं माध्यम न राहता हळूहळू नाटकासारखं होत चाललंय, अशी भावना निर्माण होते. प्रत्येक जण जणू ठरवून दिलेली भूमिका साकारत आहे. कोणी कायम आक्रमक, कोणी उपरोधिक, कोणी पीडित, तर कोणी सर्वज्ञ असल्याचा आव आणणारा. संवाद सुरू असतो, वाद रंगतो, शब्दांची देवाणघेवाण होते; पण मूळ प्रश्न मात्र तिथेच राहतात. कारण प्रश्न सोडवण्यापेक्षा अभिनय करण्यावरच जास्त भर दिला जातो.**

लोकशाहीत विरोधक बोलतात, टीका करतात, प्रश्न उपस्थित करतातहे स्वाभाविक आणि आवश्यकही आहे. त्यामुळे ''विरोधक का बोलतात?'' हा प्रश्न तितका महत्त्वाचा नाही. खरा प्रश्न असा आहे की त्यांना बोलण्याची संधी का मिळते? बहुतेक वेळा विरोधकांचे बोलणे हे कारण नसते, तर सत्ताधाऱ्यांच्या वागणुकीतून निर्माण झालेला परिणाम असतो. जिथे निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता नसते, संवाद उशिरा होतो, माहिती वेळेवर दिली जात नाही किंवा प्रश्नांना थेट उत्तर देण्याऐवजी विषय बदलला जातोतिथे विरोधकांचे मुद्दे आपोआप पुढे येतात. विरोधकांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यावर केवळ शाब्दिक प्रत्युत्तर देणे ही परिपक्व सत्तेची ओळख नाही. एखादा मुद्दा योग्य असेल, जनहिताशी संबंधित असेल, तर त्यावर काम करणे ही सत्ताधाऱ्यांची जबाबदारी आहे. पण अलीकडे अनेकदा असं दिसतं की मुद्द्यांवर काम करण्याऐवजी त्यावर उलटं बोललं जातं. प्रश्न सुटावा यासाठी नव्हे, तर समोरच्याला गप्प करण्यासाठी भाषा वापरली जाते. यातून समस्यांचे निराकरण होत नाही; उलट सार्वजनिक चर्चा भरकटते. आज शब्दांची कमतरता नाही. दररोज पत्रकार परिषदा होतात, सोशल मीडियावर प्रतिक्रिया दिल्या जातात, चर्चासत्रांतून आवाज चढवले जातात. पण जनतेला या शब्दांचा कंटाळा आला आहे. लोकांना आता भाषणं, टोले किंवा उपरोध नको आहेत; त्यांना कामं हवीत. घोषणांपेक्षा परिणाम, स्पष्टीकरणांपेक्षा सोडवणूक आणि आरोप-प्रत्यारोपांपेक्षा स्थिरताहीच अपेक्षा सामान्य माणसाची आहे. राजकारणात मौन ही कधी कधी रणनीती असते, पण तेच मौन जेव्हा जनतेच्या प्रश्नांवर असते, तेव्हा ते संशयाला जन्म देतं. लोकशाहीत पोकळी कधीही रिकामी राहत नाही. अधिकृत माहिती उशिरा आली, स्पष्ट भूमिका घेतली नाही, तर त्या रिकाम्या जागेत अफवा, अटकळ आणि नरेटिव्ह भरले जातात. नंतर विरोधक बोलले, असं म्हणणं म्हणजे जबाबदारीपासून पळ काढण्यासारखं ठरतं. याच ठिकाणी सत्ताधारी पक्षाच्या प्रवक्त्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. प्रवक्त्यांनी कोणाचेही नाव न घेता, व्यक्तीगत टीका टाळून, केवळ सरकारने केलेली कामे मांडली पाहिजेत. कोणते निर्णय घेतले, कोणत्या योजना राबवल्या, त्याचे प्रत्यक्ष परिणाम काय झालेहे स्पष्टपणे सांगितले गेले, तर आरोप आपोआप निष्प्रभ ठरतात. अन्यथा सतत उपरोध, टोलेबाजी आणि मनोरंजक विधानांकडे झुकल्यास राजकीय संवादाची पातळी घसरते आणि जनतेला ते राजकारण कमी, करमणूक अधिक वाटू लागते. खरंतर लोकशाहीत विरोधकांचे काम प्रश्न विचारणे आहे. सत्ताधाऱ्यांचे काम उत्तर देणे आहेतेही शब्दांनी नव्हे, तर कृतीतून. प्रशासन सक्षम असेल, निर्णय पारदर्शक असतील आणि परिणाम दिसत असतील, तर कोण काय बोलतो याला फारसं महत्त्व उरत नाही. कारण अखेर जनता ही टाळ्या देणारी प्रेक्षक नसून निकाल देणारी निर्णायक असते. आजचं राजकारण अनेकदा प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी दृश्य बदलण्यावर भर देताना दिसतं. प्रश्न वेगळा असतो, उत्तर वेगळ्याच दिशेने दिलं जातं. मुद्द्यांवर बोलण्याऐवजी व्यक्तींवर हल्ले होतात. यातून संवाद होत नाही; फक्त संवादाचा आभास तयार होतो. आणि हा आभास लोकशाहीसाठी धोकादायक ठरतो. सत्ताधारी जितके आत्मविश्वासू, पारदर्शक आणि कार्यक्षमतितके विरोधक कमजोर. आणि सत्ताधारी जितके बचावात्मक, प्रतिक्रियाशील आणि संवादहीनतितके विरोधक आक्रमक. हा लोकशाहीचा साधा नियम आहे. त्यामुळे विरोधकांच्या आवाजावर चिडण्याऐवजी, त्यांना बोलण्याची संधी का मिळते याचा आत्मपरीक्षणात्मक विचार करणे अधिक आवश्यक आहे. अखेर राजकारण हे नाटक नसून जबाबदारी आहे. पात्र साकारणे, संवाद फेकणे किंवा शब्दांचा अभिनय करणे याने फार काळ विश्वास टिकत नाही. लोकशाहीत टिकते ती केवळ कामगिरीदिसणारी, मोजता येणारी आणि जनतेच्या आयुष्याला थेट स्पर्श करणारी. शब्द कमी आणि कामे जास्तहाच लोकशाही मजबूत करण्याचा खरा मार्ग आहे. अन्यथा राजकारण रंगमंचावर गाजेल, पण जनतेच्या मनातून उतरल्याशिवाय राहणार नाही.



डॉ.भारत कऱ्हाड
दापोली जिल्हा
रत्नागिरी

## मद्यपानामुळे यकृतालाच नव्हे;आतड्यांनाही निर्माण होतो धोका - डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

**अल्पावधीत प्रमाणाबाहेर मद्यपान करणे, ज्याला वैद्यकीय भाषेत बिंज ड्रिंकिंग म्हटले जाते, ते आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते. हार्वर्ड मेडिकल स्कूलच्या एका ताज्या संशोधनानुसार, केवळ एकदाच अतिप्रमाणात मद्यपान केल्याने आतड्यांच्या आतील थराचे गंभीर नुकसान होऊन विषारी घटक थेट रक्तात मिसळू शकतात.**



संशोधनानुसार, दोन तासांच्या कालावधीत महिलांनी चार पेग किंवा पुरुषांनी पाच पेगपेक्षा जास्त मद्यपान करणे म्हणजे बिंज ड्रिंकिंग होय. अशा प्रकारे मद्यपान केल्याने आतड्यांची संरक्षक भिंत कमकुवत होते. आतड्यांचे मुख्य काम बॅक्टेरिया आणि विषारी घटक रक्तात जाण्यापासून रोखणे हे असते. मात्र, अतिमद्यपानामुळे या थराला छिद्रे पडतात, ज्याला लीकी गट असे म्हणतात. यामुळे हानिकारक घटक शरीरात प्रवेश करतात आणि अंतर्गत सूज निर्माण होते. दीर्घकाळ मद्यपान केल्याने यकृत खराब होते हे ठाऊक होते; पण एकदाच केलेल्या अतिमद्यपानामुळेही आतड्यांची सुरक्षा यंत्रणा कोलमडू शकते, हे या संशोधनातून सिद्ध झाले आहे. संशोधनात असे आढळले की, मद्यपानानंतर न्यूट्रोफिल नावाच्या रोगप्रतिकारक पेशी आतड्यांच्या थरात जमा होतात. या पेशी नेटस्? नावाचे जाळे सोडतात, ज्यामुळे लहान आतड्यांच्या वरच्या भागाला जखम होते आणि भिंत कमकुवत होते. आतड्यांना होणारी ही ईजा पुढे जाऊन यकृत आणि पचनाशी संबंधित गंभीर आजारांना निमंत्रण देऊ शकते. संशोधकांनी प्रयोगादरम्यान एका विशिष्ट एन्झाईमचा वापर करून हे नेटस्? ब्लॉक केले. यामुळे आतड्यांमधून होणारी बॅक्टेरियाची गळती लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे दिसून आले. याचा अर्थ भविष्यात मद्यपानामुळे होणाऱ्या नुकसानावर उपचार शोधणे शक्य होऊ शकते.

## एकनाथ लाड यांचे दुखद निधन

गेवराई । प्रतिनिधी

अखिल भारतीय लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा नगर परिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि गेवराई नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथ आप्पा लाड यांचे अल्पशा आजाराने पुणे येथे उपचार सुरु असताना दुःखद निधन झाले आहे. गेवराईचे भगीरथ म्हणून ओळख असलेल्या एकनाथ लाड यांच्या निधनाचे वृत्त समजताच शहरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पत्नी कविताताई लाड या नुकत्याच नगरसेवक म्हणून मोठ्या मताधिक्याने निवडून आलेल्या आहेत. एक निस्पृह नेतृत्व आणि अनुभवी



गेवराई नगर परिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख एकनाथ लाड हे डी २७ डिसेंबर रोजी अचानक आजारी पडल्याने अगोदर गेवराई आणि छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यांच्या तब्येतीत पाहिजे तशी सुधारणा होत नसल्याने त्यांना पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल येथे हलवण्यात आले. येथे तब्येतीत चांगली सुधारणा होत असताना दि ५ फेब्रुवारी २०२५ रोजी अचानक प्रकृती ढासळली आणि याच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉक्टरांनी सायंकाळी ३:४५ वाजता त्यांचे निधन झाल्याचे जाहीर केले. या एक महिन्यात एकनाथ लाड यांना वाचवण्यासाठी डॉक्टरांनी जिकरीने प्रयत्न करून उपचार केले. त्यांच्या कुटुंबियांनी संयम आणि मोठ्या धीराने सर्व उपचार देण्याचा आटोकाट प्रयत्न केला. दरम्यान मंत्री पंकजाताई मुंडे, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आमदार लक्ष्मणराव पवार, बाळराजे पवार, राज्य आरोग्य विभागाचे ओमप्रकाश शेटे यांनीही वेळोवेळी डॉक्टरांशी संपर्क साधून एकनाथ लाड यांच्या तब्येतीबाबत विशेष लक्ष देण्याच्या सूचना करत कुटुंबीयांनाही धीर दिला. मात्र सर्वांचेच प्रयत्न असफल झाले. एकनाथ लाड यांनी नगर परिषदेच्या माध्यमातून प्रदीर्घ काळ जनसेवा करताना त्यांनी अनेकांना मदतीचा हात दिला. त्यांचा मनमिळावू स्वभाव आणि कामाप्रती असलेली निष्ठा नेहमीच सर्वांसाठी प्रेरणादायी राहील. नगरपरिषद कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय लाड समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष, नगर परिषद कर्मचारी पतसंस्थेचे चेअरमन, नगर परिषद पाणी पुरवठा विभागाचे प्रमुख आणि कालाविष्कार प्रतिष्ठानचे पदाधिकारी अशा विविध पदांवर त्यांनी काम करून आपली एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी नगरसेवक कविताताई लाड, मुलगा प्रथमेश आणि मुलगी प्राजक्ता असा परिवार आहे. एकनाथ लाड यांच्या जाण्याने लाड परिवारासह संपूर्ण गेवराई शहरावर शोककळा पसरली आहे. आज दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ वाजता गेवराई येथील चिंतेश्वर मंदिर परिसरातील स्मशान भूमी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. लाड परिवाराच्या दुःखात आम्हीही सहभागी आहोत.

### स्व.अजित दादांच्या निधनामुळे शिवजयंती निमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम रद्द

## शासकीय महापूजा, अभिवादन करून साधेपणाने साजरी होणार शिवजयंती

बीड । प्रतिनिधी

**राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री, दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे बीड येथे बीड शहर सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने दरवर्षी साजरे होणारे कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.दरम्यान सकाळी ७:०० वा. होणाऱ्या शासकीय महापूजा आणि अभिवादन सभेस मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन बीडचे आ संदीप क्षीरसागर आणि सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर च्या वतीने करण्यात आले आहे.**

गेल्या ३० वर्षांपासून बीड शहरात, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहराच्या आयोजनातून डीजेमुक्त आणि वर्गणी मुक्त असणारी शिवजयंती, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आदर्श पद्धतीने साजरी केली जाते. सालाबादप्रमाणे यंदाही जल्लोषात शिवजयंती साजरी करण्यासाठी शिवकालीन मर्दानी खेळ आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परंतु काही दिवसांपूर्वीच दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार यांचे विमान अपघातात आकस्मिक आणि दुर्दैवी निधन झाले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या दुःखद पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशीलतेची जाणीव ठेवत, यावर्षी शिवजयंती कोणतेही जल्लोषी कार्यक्रम न करता साधेपणाने साजरी करण्याचा निर्णय समितीच्या वतीने घेण्यात आला आहे.

### परंपरेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते होणार शासकीय महापूजा

परंपरेप्रमाणे सकाळी ७:०० वा. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहरचे अध्यक्ष, सचिव आणि पदाधिकारी तसेच विविध मान्यवर यांच्या हस्ते शासकीय महापूजा आणि अभिवादन करून साधेपणाने शिवजयंती साजरी केली जाणार आहे. शासकीय महापूजा आणि अभिवादन कार्यक्रमासाठी दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७:०० वा. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर आणि सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.

## पान १ वरून...

### भारत-अमेरिका करारावरून

किसान मोर्चाने हल्लाबोल केला आहे. त्यांनी पुढे म्हटले आहे की, केंद्र सरकारने ९ डिसेंबर २०२१ रोजी एसकेएमला जी लेखी आश्वासने दिली होती; त्याची पूर्तता केलेली नाही. ज्यात सी २+५० टक्के फॉर्म्युल्याच्या आधारावर शेतमालाच्या हमीभावाने खरेदीची हमी, सरसकट कर्जमाफी आणि वीज क्षेत्राचे खासगीकरण न करणे यांचा समावेश होता. बीकेयू (लखोवाल गट) चे अध्यक्ष हरविंदर सिंग लखोवाल यांनी म्हटले आहे की, अमेरिका-भारत व्यापार कराराचा तपशील समोर आल्याशिवाय काही बोलू शकत नाही. जर या करारामुळे शेतकरी, दुग्ध व्यवसाय आणि मत्स्यद्योग क्षेत्रांवर परिणाम झाल्यास २०२०-२१ सारखे तीव्र आंदोलन केल्याशिवाय आमच्याकडे दुसरा पर्याय नसेल. त्यानंतर आम्ही केंद्र सरकारला या कराराबाबत त्यांचा निर्णय मागे घेण्यास भाग पाडू.

---------------

### २१ वर्षाची पुनरावृत्ती; पंतप्रधानांच्या

खासदारांनी संसदेत सतत व्यत्यय आणि गोंधळ घाल्याने लोकसभा अध्यक्षांनी कामकाज तहकूब केले. त्यानंतर दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सत्रावेळी लोकसभा स्पीकर ओम बिर्ला यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर आभार प्रस्ताव वाचून दाखवला. त्यानंतर आवाजी मतदानाने हा प्रस्ताव पारीत करण्यात आला. मात्र यावेळी देखील विरोधी पक्षाचे सदस्य घोषणाबाजी करत होते. यानंतर प्रदर्शन थांबण्याचे नाव घेत नाही हे पाहून स्पीकर ओम बिर्ला यांनी सभागृह दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केले. २००४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांना भाजपकडून राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर आभार प्रस्तावावेळी भाषण करताना रोखण्यात आले होते. आता २०२६ मध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील विरोधी पक्षांच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भाषण करण्यापासून रोखले आहे. काँग्रेसचे सचिव जयराम रमेश यांनी याबाबतचा जुना व्हिडिओ एक्सवर पोस्ट केला आहे. यात मनमोहन सिंग हे २००५ मध्ये सभागृहाला संबोधित करत होते. त्यात मनमोहन सिंग हे २००४ मध्ये त्यांना राष्ट्रपतींच्या अभिभाषणाच्या आभार प्रस्तावावर भाषण करू देण्यात आले नसल्याचा उल्लेख करत आहेत.

----------

### धन्या ...परळीचं खरखटं....म्हणत

दूध का दूध पानी का पानी होऊ द्या. परळीचं खरखटं गप्प बसणार नाही, जामीन झालं की पुन्हा पुन्हा तो कट रचणार असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली. हे सगळं घडवून आणतो तो धन्याच आहे, असं म्हणत जरांगे पाटील यांनी आ. धनंजय मुंडेंवर टीका केली. तू धुतल्या तांदळाचा होता तर तू म्हणायला पाहिजे होतं की, धन्यासहीत नार्को टेस्ट करा, असे मुंडे म्हणाले. खुणेच्या आईनं आणि पत्नीनं सांगितलं होतं की तो पितोय. हे पोरगं असं आहे की स्वतः सुखानं खायचं नाही घरच्याला सुखानं तुकडे खाऊ द्यायचं नाही. याला कोणीतरी फुस लावंल म्हणून मी एसपींना सांगितलं. तुला कोणी सांगितलं गेलंय का किंवा याने इसार घेतला होता का? असा सवाल जरांगे यांनी केला. झालेले आरोप सिद्ध करावे लागतील नाहीतर पुढच्या काळात फौजदारी गुन्हे दाखल होणार आहेत, आता सुट्टी नाही, असे जरांगे पाटील म्हणाले. आंदोलनाचे जे आरोप करायचे आहे त्याचे तुला पुरावे द्यावे लागतील नाहीतर फौजदारी गुन्हे दाखल होतील. तुझं पुढे बघ आता काय काय होतं तू फक्त नीट राहू नकोस इथून पुढे असे जरांगे म्हणाले. दुसऱ्या जातीच्या लोकांना खुश करण्यासाठी तू आपल्या जातीला डाग लावतो का? असा सवाल देखील जरांगे यांनी केला. मात्र गेली काही महिने शांत असलेला हा आरोप प्रत्यारोपाच्या फ़ैरी पहाता हा रोष वाढत आहे खुणे याने आरोप केले. त्यावर बोलणे सोडून, धनंजय मुंडेंवर एकेरी भाषा वापरून दिलेला इशारा आणि त्यानंतर सोशल माध्यमावर समर्थकांकडून टीका टिपणी सुरु झाल्या यावरून पुन्हा दोन समाजात तेढ निर्माण झाल्याचे दिसत आहे.

-----------

### राज्यातील शाळांमध्ये

या अहवालामुळे राज्यातील शाळांमधील मूलभूत सुविधांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या शाळांमध्ये १,०४३ शासकीय, ६४ खासगी अनुदानित, २० खासगी विनाअनुदानित आणि ३७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. वर्ष २०२४ ते २०२६ या दोन वर्षांतील शिक्षण विभागाचा सांख्यिकी अहवाल २९ जानेवारीला शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सादर केला गेला. मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसणे ही केवळ सोयीची नव्हे तर मुलींच्या शिक्षणावर थेट परिणाम करणारी बाब मानली जाते. किशोरवयीन मुलींसाठी सुरक्षित व स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा नसल्याने शाळा गळतीचे प्रमाण वाढण्याची शक्यता शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. या अहवालामध्ये असुविधांचा पाढा वाचण्यात आला आहे. वीज नसलेल्या ३,३२८ शाळांमध्ये ३,१०२ शासकीय, १३१ खासगी अनुदानित, १९ विनाअनुदानित आणि ७६ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. वीज नसलेल्या शाळांचा तपशील : नंदुरबार- ४५५, गडचिरोली- ४३१, बीड- ३८६, नांदेड- २२९, परभणी- २००, हिंगोली- १७४, धुळे -१६३, नाशिक- १६३, संभाजीनगर- १५७, लातूर- १३६, जालना- ११८. याशिवाय राज्यातील २,४२८ शाळांमध्ये हँडवॉश दिले जात नाही. अशा शाळांमध्ये १,५८७ शासकीय, ४५८ खासगी अनुदानित, ५६ विनाअनुदानित आणि ३२७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. यामुळे संताप व्यक्त करण्यात येत आहे.

**महिनाभरात व्यवस्था करणार - शिक्षणविभाग**

आमच्या उच्चस्तरीय बैठकीत शाळांमधील सुविधांच्या कमतरतेबाबतचा अहवाल सादर झाला. येत्या एक महिन्यात संबंधित शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची व्यवस्था केली जाईल, असे शिक्षण विभागाने या विषयी म्हटले आहे.

--------------

### तांत्रीक समस्येसह मानव

गेल्या २८ जानेवारी रोजी जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी अजित पवार खासगी विमानाने मुंबईहून बारामतीकडे रवाना झाले होते. बारामती विमानतळावर विमानाचे अवतरण (लँडिंग) होत असताना हा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत अजित पवारांसह विमानातील अन्य पाच सहकाऱ्यांचा दुर्दैवी अंत झाला होता. या घटनेची नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले होते. प्राथमिक अहवालातील निरीक्षणांनुसार, विमान उतरण्याच्या अंतिम क्षणी त्याच्या नियंत्रण प्रणालीमध्ये किंवा इंजिनमध्ये गंभीर तांत्रिक बिघाड निर्माण झाला असावा, ज्यामुळे वैमानिकाचे विमानावरचे नियंत्रण सुटले. अहवालातील सर्वात महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे वैमानिकाचा चुकलेला लँडिंग अँगल. बारामती विमानतळावर उतरत असताना प्रतिकूल हवामान किंवा अचानक उद्भवलेल्या तांत्रिक समस्यांमुळे वैमानिकाला धावपट्टीची योग्य दिशा आणि उंची राखण्यात अडचण आली. यामुळे विमान धावपट्टीच्या मूळ मार्गावरून भरकटले आणि बाजूच्या मोकळ्या जागेत वेगाने जाऊन आदळले. धावपट्टीचा अंदाज घेण्यात झालेली ही चूक विमानाची गती आणि इंधन स्थिती लक्षात घेता अत्यंत जीवघेणी ठरली, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

**अंतिम अहवालाची प्रतीक्षा**

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, हा केवळ प्राथमिक अहवाल असून सखोल चौकशीची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी विमानाचा ब्लॅक बॉक्स आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर यांमधील डेटाचे सविस्तर विश्लेषण केले जात आहे. तांत्रिक बिघाड नेमका कोणत्या क्षणी सुरू झाला आणि वैमानिकाचे अखेरच्या क्षणी काय संभाषण झाले, यावरून अनेक महत्त्वाचे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता आहे. या सर्व तांत्रिक पुराव्यांच्या तपासणीनंतरच अपघाताचे अंतिम कारण स्पष्ट करणारा सविस्तर अहवाल प्रसिद्ध केला जाईल.

---------

### लातूरच्या महापौरपदासाठी

येथील महापालिकेत भारतीय जनता पक्षाला २२ जागांवर समाधान मानावे लागले, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) केवळ एकाच जागेवर विजयी ठरला आहे. त्यामुळे, भाजप विरोधी बाकावर बसणार आहे. दरम्यान, लातूरमध्ये महिला प्रवर्गासाठी महापौर पदाचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामुळे, येथील महापालिकेत महिला महापौर असणार आहे. महापौर आणि उपमहापौर पदासाठी जयश्री सोनकांबळे आणि अ‍ॅड. स्नेहल उटगे यांचीच नावे समोर आल्याने या निवडी औपचारिक ठरल्या आहेत. निकाल स्पष्ट होताच लातूर महानगरपालिकेच्या प्रांगणात काँग्रेस पक्षाच्या वतीने विजय जल्लोष साजरा करण्यात आला. कार्यकर्त्यांनी फटाके फोडत, घोषणाबाजी करत आनंद व्यक्त केला. महिला सुरक्षितता, शहरांमधील स्वच्छता आणि शहरात अनेक ठिकाणी सीसीटीव्हीची सोय योग्य पद्धतीने करण्याचे प्राधान्याने काम करण्यात येणार असल्याची माहिती नवनिर्वाचित महापौर जयश्री सोनकांबळे यांनी दिली. तर, रस्ते पाणी आणि कचरा या शहराच्या मूलभूत समस्या आहेत. या समस्येचे निराकरण करण्यासाठी योग्य तो रोड मॅप तयार करण्यात येईल. निसर्गानं भरभरून पाणी दिलं आहे. मात्र, पाणीपुरवठा उशिरा होतोय. त्याचं सुसूत्रीकरण करून लातूरकरांना योग्य आणि मुबलक पाणीपुरवठा कसा करता येईल याबाबत आम्ही काम करणार आहोत, असे उपमहापौर एडवोकेट स्नेहल उटगे यांनी निवडीनंतर बोलताना म्हटले. दरम्यान, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी लातूरमधील सभेतून दिवंगत नेते तथा मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या आठवणी लातूरमधून पुसून जातील, असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्यभरात लातूरची निवडणूक गाजली. तसेच, येथील महापालिकेत कोणाची सत्ता येणार याकडेही सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर, काँग्रेसने लातूरचा गड राखला असून ४३ जागांसह स्पष्ट बहुमत मिळवले आहे.

-------------

### शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून

मंत्री श्रीमती मुंडे यांनी आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रविणकुमार देवरे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्यातील पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, सशक्त पशुधन हा उद्देश ठेवून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. राज्यातील शेतकरी व पशुपालकांना नवनवीन पशुधनाची, त्यांच्या निगराणीविषयक तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, यासाठी महापशुधन एक्स्पो महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांच्या दृष्टिकोनातून प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी. हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन व जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने कामे करावीत. या प्रदर्शनात जैविक शेती, पशुधनापासून होणारे लाभ याविषयी माहिती शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी चर्चासत्रे आयोजित करण्यात यावीत. पशुप्रदर्शनात १५०० पशु प्रदर्शीत करण्यात येणार आहेत. त्याशिवाय राज्य शासनाच्या कृषी, महिला व बालविकास यासह विविध विभागांचे माहितीपर स्टॉल असणार आहेत. तसेच बचतगटांचे स्टॉलही या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. प्रदर्शनास भेट देणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याने या सर्वांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रदर्शनाचा परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यात यावा. महिलांसाठी वेगळा कक्ष उभारून त्या ठिकाणी आवश्यक सुविधा व सुरक्षितता उपलब्ध असावी. प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या पशुंच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. त्याशिवाय वैद्यकीय सुविधा कक्ष, रुग्णावाहिका, अग्निशमन यंत्रणा, पोलिस संरक्षण, स्वयंसेवक यांचीही नियुक्त करण्यात यावी, अशे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.

**पशुंची विशेष व्यवस्था**

या प्रदर्शनात विविध जातींच्या पशुंचा समावेश असणार आहेत. त्यांच्यासाठी विशेष व्यवस्था, डॉग शोसह विविध प्राण्यांसाठी ४० प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धांचे योग्य मूल्यांकन करण्यात येऊन विजेत्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. राज्यातील पशुंशिवाय परराज्यातील गुणवंत व दर्जेदार पशुपक्षी यांचेही प्रदर्शन होईल. याचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. प्रदर्शनाच्या ठिकाणी रक्तदान शिबिर, अवयवदान संमती पत्र आदी सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

**३०० स्टॉल अन् मुख्य सभास्थानी वीस हजार आसनक्षमता**

पशुसंवर्धन आयुक्त देवरे यांनी प्रदर्शनाच्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनास येणाऱ्यांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून पशुधन घेऊन येणाऱ्या वाहनांसाठीही वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्य सभास्थानी वीस हजार आसनक्षमता असणार आहे. त्याशिवाय पारितोषिक पात्र पशुधनांचे विशेष प्रदर्शन या ठिकाणी असणार आहे. तीन वेगवेगळ्या पेंडॉलमध्ये सुमारे ३०० स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रदर्शनात पशुपालकांसमवेतच या क्षेत्रातील उद्योजकही सहभागी होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**जिल्हाधिकारी यांनी दिली व्यवस्थेची माहिती**

जिल्हाधिकारी जॉन्सन यांनीही प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनात येणाऱ्या नागरिकांसाठी पहिल्या टप्प्यात वीस एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच गर्दी नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आदींची तयारी करण्यात आली आहे. स्वयंसेवक म्हणून 'एनसीसी'च्या विद्यार्थ्यांचे सहाय्य घेण्यात येणार आहे. प्रदर्शनात महिला व विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच पोलीसांचे हेल्प डेस्क उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

----------

### कर्जत येथे राज्यस्तरीय पत्रकार

उपक्रम राबवत असतात. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याचा राज्य पातळीवर गौरव व्हावा, प्रोत्साहन मिळावे आणि इतर संघनाही प्रेरणा मिळावी, या उद्देशाने प्रत्येक महसूल विभागातून एका आदर्श तालुका पत्रकार संघाची निवड करून त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जातो. या कार्यक्रमाच्या नियोजन व आढावा संदर्भात पुणे येथील दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयात नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत कार्यक्रम अधिक प्रभावी, नियोजनबद्ध आणि यशस्वी कसा करता येईल, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच राज्यभरातील अधिकाधिक पत्रकारांनी या सोहळ्यात सहभागी व्हावे, यासाठी संपर्क, आमंत्रण व समन्वयाबाबतही नियोजन करण्यात आले. या बैठकीस अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख, शरद पाबळे, राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशे, पिंपरी-चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल वडघुले, डिजिटल अध्यक्ष विनय सोनवणे, सचिव सागर सूर्यवंशी यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील मान्यवर पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या निमित्ताने राज्यातील पत्रकारांमध्ये संवाद, अनुभवांची देवाणघेवाण आणि संघटनात्मक बळकटी साधली जाणार असून, पत्रकारितेच्या मूल्यांना चालना देणारा हा कार्यक्रम ठरणार आहे, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

--------------

### लाडक्या बहिणींना एकत्रित

लाभ मिळू शकला नव्हता. यामुळे लाभार्थी महिलांमध्ये नाराजी होती. यावर स्पष्टीकरण देताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, ज्या बहिणींचे पैसे तांत्रिक कारणांमुळे थांबले आहेत, त्यांना काळजी करण्याची गरज नाही. अंगणवाडी सेविकांमार्फत पडताळणीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच पात्र महिलांच्या खात्यात ३ महिन्यांचे पैसे एकाच वेळी जमा होतील. तसेच त्यांनी बहिणींना २१०० रुपये देण्याचे दिलेले आश्वासनही लवकरच पूर्ण होणार असल्याचे संकेत दिले. लाडकी बहीण ही माझी अत्यंत आवडती योजना आहे. माझ्या आईच्या प्रेरणेतून ही संकल्पना जन्माला आली. मला माझ्या राज्यातील बहिणींना केवळ मदत करायची नाही, तर त्यांना लखपती होताना पाहायचे आहे., असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. आम्ही बहिणींना आर्थिक बळ देत आहोत, पण काही लोक केवळ टीका करण्याचे काम करत आहेत. तुम्ही स्वतः काही दिले नाही आणि आम्ही देतोय तर त्यावरही तुमचे आक्षेप आहेत, अशा शब्दांत त्यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता टोला लगावला.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी २०२६
३

## थोडक्यात

### आज पासून संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त रौळसगांवात तीन दिवसीय धार्मिक कार्यक्रम

चौसाळा । प्रतिनिधी



श्री संत गजानन महाराज चॅरिटेबल ट्रस्ट रौळसगांव विश्वस्त मंडळावतीने श्री संत गजानन महाराज प्रगट दिन व सत्कीर्तन विजय ग्रंथाचे पारायण या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे हा सोहळा ६ ते ८ फेब्रुवारी दरम्यान श्री संत गजानन महाराज मंदिर शेरी रौळसगांव येथे श्रद्धा व भक्तीभावनी साजरा केला जाणार आहे. या कालावधीत रोज सकाळी ८ वाजता नगर प्रदक्षिणा व ९ ते ११ वेळेत श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण सोहळा होईल तसेच तसेच प्रगट दिनानिमित्त दिनानिमित्त रविवारी सकाळी ११ ते १ या वेळेत ह भ प श्री गणेश महाराज कचरे तलवाडा त्वरिता देवी यांचे सुश्राव्य हरी कीर्तन होणार आहे हा तीन दिवसीय सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन विश्वस्त मंडळाचे राजेंद्र पांडे यांनी केले



### महिला महाविद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात

गेवराई । प्रतिनिधी


जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई ची शैक्षणिक सहल मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

या शैक्षणिक सहली मध्ये देवगिरी किल्ला, वेरुळ लेणी आणि घृष्णेश्वर मंदिर या स्थळांना भेटी देण्यात आल्या. यावेळी देवगिरी किल्यावरील ऐतिहासिक वास्तू ची माहिती घेण्यात आली. वेरुळ येथील कैलास मंदिर लेणी, विश्वकर्मा लेणी, दशावतार लेणी, इंद्रसभा लेणी इ. लेण्यांना भेट देऊन त्यांची ऐतिहासिक माहिती घेतली. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असे वेरुळ येथील घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग चे दर्शन घेऊन सहल संपन्न झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सहल समिती प्रमुख प्रा. डॉ. रामहरी काकडे, प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड यांनी या सहलीचे आयोजन केले होते. या सहली मध्ये हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. संगीता आहेर, इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. कैलास सावंत, प्रा. डॉ. राजाभाऊ चव्हाण, प्रा. बाबु वादे हे सहभागी झाले होते. या सहली मध्ये ऐतिहासिक माहिती मिळाली. किल्ले भ्रमंती मुळे शारीरिक आरोग्याचे महत्त्व समजले. अशा प्रतिक्रिया सहभागी विद्यार्थीनींनी दिल्या.

### धुनकवाड येथे महाशिवरात्रीनिमित्त शिवपुराण कथेचे आयोजन

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड नं.२ येथे ग्रामदैवत धुनकेश्वर मंदिरात महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त शिवपुराण कथेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी घ्यावा असे आवाहन आयोजक बाबुराव भोसले यांनी केले आहे.



दि.९ फेब्रुवारी २०२६ सोमवार रोजी शिवपुराण कथेस प्रारंभ होणार असून दि.१६ फेब्रुवारी २०२६ सोमवार रोजी सांगता होणार आहे. दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत शिवपुराण कथा प्रवक्ते ह.भ.प. गुरुवर्य अरविंद बाबा गिरी यांच्या सुश्राव्य वाणीतून कथा श्रवणाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. कथेला गायनाची साथ देण्यासाठी गायनाचार्य सुभाष महाराज आजबे, रमेश महाराज सावंत तर संगीताची साथ देण्यासाठी सिंथ वादक शिवाजी महाराज नांदे व तबलावादक लक्ष्मण महाराज गायकवाड सहभागी होणार आहेत.हरिपाठ नेतृत्व मारोती महाराज सुरवसे (सातारा)हे करणार आहेत.दि.१४फेब्रुवारी संध्याकाळी अशोक राघु करांडे यांची पंगत होणार आहे. तरी दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा, दुपारी २ ते ५ शिवपुराण कथा,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ त्यानंतर हरिजागर होणार आहे. तरी या पवित्र धार्मिक सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने घ्यावा असे आवाहन धुनकवाडचे माजी उपसरपंच तथा आयोजक बाबुराव भोसले यांनी केले आहे.

# खांडे पारगाव येथे टुकूर नदीत तहसीलदार शेळके यांच्या हस्ते मोफत वाळूचे वितरण

बीड । प्रतिनिधी

**''घरकुल उभं राहावं , भिंतींना आधार मिळावा, गरीबाच्या घरावर वाळूचा भार न पडावा''या भावनेतून राज्य शासनाने राबविलेली मोफत वाळू वितरणाची योजना बीड जिल्ह्यात प्रभावीपणे आकार घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या वाळू धोरणाची अंमलबजावणी बीड जिल्ह्यात काटेकोरपणे सुरू असून, ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना थेट दिलासा देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न प्रत्यक्ष जमिनीवर उतरल्याचे दिसून येत आहे.**

छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे वेळोवेळी विभागस्तरावर आढावा घेत मार्गदर्शन करत असून, बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्हास्तरावर संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवत सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क साधून वाळू उपलब्धता, प्रस्ताव व वितरण याबाबत समन्वय साधला आहे. बीड तालुक्यात घरकुल योजनेंतर्गत एकूण २५ हजार ३५३ लाभार्थी उद्दिष्ट असून त्यापैकी २३ हजार ३८६ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. पहिल्या टप्प्यात १९ हजार ८७५ लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळालेला असून सध्या सुमारे ७ हजार १०० घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या घरकुल बांधकामासाठी वाळू ही अत्यावश्यक बाब असल्याने मोफत वाळू वितरण योजना ग्रामीण भागासाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

बीड तालुक्यात दहा वाळू घाट निश्चित - बीड तालुक्यासाठी दहा वाळू घाट निश्चित करण्यात आले असून सिंधफणा नदीपात्रातील



विविध ठिकाणी हे घाट आहेत. रंजेगाव, रामगाव, बऱ्हाणपूर, आडगाव, कुक्कडगाव, खुंड्रस , साक्षाळ पिंपरी आदी ठिकाणी वाळू उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय अंधापुरी, पिंपळादेवी, नागापूर बु., खांडे पारगाव , पारगाव सिरस या गावांमध्ये नव्याने नोंदणी केलेले प्लॉट असून येथून वाळू उपलब्ध करून देण्यात येत आहे. खांडे पारगाव येथे प्रत्यक्ष वितरण - या पार्श्वभूमीवर बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी बीड तालुक्यातील अथरवन पिंपरी जवळील टुकूर नदीपात्रात खांडे पारगाव येथील घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वितरण करण्यात आले. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. या वेळी घरकुल लाभार्थी मधुकर तुकाराम सपकाळ व विकास बाबुराव आमटे यांना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या उपस्थितीत मोफत वाळू वाटप करण्यात आले. २५ पैकी १२ लाभार्थ्यांना वाळू वाटप पूर्ण - याबाबत माहिती देताना ग्राम महसूल अधिकारी अक्षय ढोपे यांनी सांगितले की, आतापर्यंत एकूण २५ घरकुल लाभार्थ्यांपैकी १२ लाभार्थ्यांना मोफत वाळूचे वितरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांनाही टप्प्याटप्प्याने वाळू दिली जाणार आहे . सध्या सुमारे ६०० ब्रास वाळूचे वितरण होणार असून, ज्या ठिकाणी वाळू उपलब्ध आहे तेथील प्रस्ताव तात्काळ दाखल करण्याच्या सूचना ग्राम महसूल अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांचा सहभाग - या वेळी खांडे पारगाव गावचे उपसरपंच अनील आबा आमटे , दत्ता सुरवसे, नवनाथ बापू सपकाळ, रवींद्र सपकाळ तसेच अथरवन पिंपरी येथील उपसरपंच अशोक शिंदे, प्रवीण शिंदे, अमोल शिंदे यांच्यासह घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून प्रशासनास सहकार्य करत हा उपक्रम यशस्वी केला. यावेळी बोलताना तहसीलदार चंद्रकांत शेळके म्हणाले, '' बीड तालुक्यातील लहान नद्या, ओढे, नाले यामध्ये नैसर्गिकरित्या साठणारी वाळू शासन धोरणानुसार घरकुलधारकांना मोफत देण्यात येणार आहे. यामुळे अवैध वाळू उपसा थांबेल आणि गरजू नागरिकांना थेट लाभ मिळेल.घरकुलासाठी वाळू मिळवणे आमच्यासाठी मोठी अडचण होती. प्रशासनाने थेट नदीपात्रातून वाळू उपलब्ध करून दिल्यामुळे आमचा खर्च वाचला,'' अशी प्रतिक्रिया एका लाभार्थ्याने व्यक्त केली. गावकऱ्यांनी प्रशासन व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आभार मानले. ग्रामीण घरकुलांसाठी दिलासादायक उपक्रम - एकीकडे अवैध वाळू वाहतुकीवर कठोर कारवाई आणि दुसरीकडे शासन निर्णयानुसार पारदर्शक पद्धतीने मोफत वाळू वाटप या दोन्ही बाबींचा समतोल राखत बीड जिल्ह्यात प्रशासन काम करत असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले आहे.

''घर बांधणं स्वप्न नाही,योग्य हात मिळाले तर सत्य होतं''

ग्रामीण भागातील घरकुलधारकांसाठी हा उपक्रम निश्चितच दिलासादायक ठरणार असून, पुढील काळातही शासन धोरणानुसार अशीच कार्यवाही सुरू राहणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## गेवराईचे ज्येष्ठ पत्रकार काझी अमान यांना पत्रकार संघाचा मूकनायक पुरस्कार प्रदान

गेवराई । प्रतिनिधी

गेवराईचे ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक दिव्य लोकप्रभाचे उपसंपादक काझी अमान यांना सिद्धेश्वर मंदिर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. दिलीप घोगे बाबा उर्फ मसाननाथ महाराज व डी.वाय.एस.पी.अनिल कटके यांच्या हस्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी महाराष्ट्र पत्रकार संघाचा मूकनायक पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. या पत्रकार संघाचे राज्य अध्यक्ष विलासराव कोळेकर व जिल्हाध्यक्ष बापूसाहेब हुंबरे यांनी या पुरस्काराची घोषणा केली होती. यापूर्वी काझी अमान यांना दर्पण पुरस्कारासह इतर अनेक पुरस्कार मिळाले असून या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

काझी अमान हे गेल्या चाळीस वर्षांपासून पत्रकारितेत सक्रिय असून शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सन १९८३-८४ साली



दैनिक झुंजारनेता पासून त्यांनी आपल्या पत्रकारितेस सुरुवात केली. मराठवाड्यातील पहिले मराठी दैनिक अजिंठा, दैनिक लोकमत (मराठी), लोकमत समाचार (हिंदी), दैनिक महानगर (मराठी), दैनिक भास्कर (हिंदी) आदी नामांकित दैनिकात त्यांनी काम केले असून गेल्या पाच वर्षांपासून दैनिक दिव्य लोकप्रभाचे उपसंपादक म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय मराठवाड्यातील पहिले उर्दू दैनिक औरंगाबाद टाइम्सचे गेवराई तालुका प्रतिनिधी आणि दैनिक तामीर (उर्दू व हिंदी) या वर्तमानपत्राचे विशेष प्रतिनिधी म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे सदस्य व गेवराई तालुका राष्ट्रीय पत्रकार संघाच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीपणे सांभाळलेली आहे. त्यांनी लिहिलेल्या '' गेवराईचा सायकल रिक्षावाला श्रीमंतांच्या नाकावर टिच्चून भागवतोय तहानलेल्यांची तहान '' या विशेष वृत्ताला प्रथम पुरस्कार मिळाला होता. यापूर्वी त्यांना दर्पण पुरस्कारासह इतर अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. काझी अमान हे गेवराई तालुक्याचे पहिले आणि सर्वात ज्येष्ठ दिवंगत पत्रकार काझी हयातुल्ला यांचे ज्येष्ठ चिरंजीव असून आपल्या वडिलांच्या पत्रकारितेचा वारसा ते यशस्वीपणे पुढे चालवीत आहेत. मूकनायक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पान ६ वरुन...

### मच्छिंद्रनाथ गडावर भाविकांचे

गुन्हा दाखल झाला होता. तेव्हापासून पोलीस या टोळीच्या मागावर होते

सीसीटीव्ही आणि गोपनीय माहितीचा आधार

सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय खबऱ्यांच्या आधारे पाथर्डी येथील सुधीर कराळे याला ताब्यात घेतले. चौकशीअंती त्याने आपल्या पाच साथीदारांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपी सध्या पोलीस कोठडीत असून, पोलीस त्याच्या इतर साथीदारांचा कसून शोध घेत आहेत. या मोहिमेत पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, आदिनाथ भडके, हरिभाऊ बांगर, कृष्णा नरवडे आणि जयराम उबे यांच्या पथकाने मोलाची कामगिरी बजावली

### पंचायत समितीमध्ये

भ्रष्टाचाराचा विळखा

पाटोदा पंचायत समितीमध्ये घरकुल योजनेच्या हप्त्यासाठी ठराविक टक्केवारी ठरलेली असल्याची चर्चा आता उघडपणे तालुक्यात होत आहे. हप्ते वेळेवर न मिळाल्याने अनेकांच्या घरांची कामे अर्धवट अवस्थेत पडली असून, पावसामुळे साहित्याचे नुकसान होत असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.

''गोरगरिबांच्या हक्काच्या पैशात वाटा मागणं लाजीरवाणं आहे. जर ही अडवणूक थांबली नाही, तर आम्ही वरिष्ठ पातळीवर तक्रार करू आणि लोकशाही मार्गाने आंदोलन छेडू.'' संतप्त लाभार्थी

### विठ्ठल रुक्मिणी मंदिरात

ह.भ.प.निळकंठ महाराज तावरे (संस्थापक श्री संत मदन महाराज गुरूकुल संस्थान,केळसांगवी),

महंत काशिनाथ महाराज शास्त्री (श्री क्षेत्र गणेशगड संस्थान, नागतळा), ह.भ.प. सुदर्शन महाराज उदासीन (श्री क्षेत्र सुदर्शन आश्रम,शिदेवाडी) यांचे हरिकीर्तन होणार आहे. रविवार दि.२२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ ते ११ यावेळात ह.भ.प.कैलास महाराज भोरे (देवदैठण) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे अशी माहिती सप्ताह समिती व संयोजक ह.भ.प.धोंडीबापु वांढरे महाराज यांनी दिली. यावर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे १३ वे. आहे.

### आष्टी प्रीमियर लीगचा थरारक

₹१,००,००० द्वितीय पारितोषिक: धवलगिरी इंडियन ₹७१,०००
तृतीय पारितोषिक: शमशेर फायटर ₹३१,०००
चतुर्थ पारितोषिक: २१ एस.जे. कन्स्ट्रक्शन ₹२१,०००

या आष्टी प्रीमियर लीगमध्ये संपूर्ण कालावधीत धमाकेदार व चुरशीचे सामने पाहायला मिळाले. अंतिम सामना पाहण्यासाठी हजारो क्रिकेटप्रेमी प्रेक्षक मैदानावर उपस्थित होते.

यावेळी संयोजक नगराध्यक्ष जियाभाई बेग, पांढरी गावचे सरपंच सुधीर आबा पठाडे, सभापती बद्रीनाथ भाऊ जगताप, नगरसेवक किशोर मामा झरेकर, भारत भाऊ मुरकुटे, बाळासाहेब घोडके, समीर शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

विजयानंतर रामभाऊ जगताप, संपत जगताप व बद्रीभाऊ जगताप मित्रमंडळाने डीजेच्या तालावर गुलालाची उधळण करत खेळाडूंना घेऊन शहरातून भव्य विजयी मिरवणूक काढली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पंच जितेंद्र लोंढे, अशोक डोमाळे, प्रवीण कुलकर्णी, डान्सिंग अंपायर नितीन वेताळ (पुणे), समालोचक अनिकेत गुंजाळ (जुन्नर), तेजस भास्कर (राहुरी) तसेच नागेश करांडे, अशोक कारंडे (आष्टी) यांनी मोलाचे योगदान दिले.

### पाणीपुरवठा स्वच्छता

त्यामुळे कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी मोठी अडचण निर्माण होणार आहे. जोपर्यंत निधी उपलब्ध होणार नाही तोपर्यंत हे काम बंद आंदोलन सुरूच राहणार आहे. जर राज्यस्तरावरून दखल घेतली नाही तर सामूहिकरीत्या आझाद मैदानावर आमरण उपोषणाचा इशारा महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समिती यांच्या कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

### आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी

माध्यमिक चंद्रशेखर तौर, प्राथमिक सारिका तौर, स्नेहसंमेलन प्रमुख पांडुरंग होके,नागकन्या घुसे, रेणुका जोशी हे होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.या स्नेह संमेलनास विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शब्दरुपी धन माणसाला

कौशल्यासंबंधीची तत्त्वे सांगितली. अंबाजोगाई येथील शिवतेज अकॅडमीचे श्री. माणिक पाटील यांनी सरळ सेवा व स्पर्धा परिक्षांसंबंधी माहिती दिली. उद्योजक श्री. ईश्वर खामकर यांनी यशस्वी उद्योजक कसे होता येते याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच शिक्षण विद्यार्थ्यांना जगायला शिकविते असा संदेश दिला. याप्रसंगी माजी विद्यार्थी जयंत जगताप फोटोग्राफी मध्ये यशस्वी विद्यार्थी तर वैष्णवी साळवे, अमन बेग, कृष्णा मुंढे, ओम सुरवसे यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. याप्रसंगी विचारमंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य डॉ. एम. एन. गायकवाड यांबरोबरच प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्याची उपस्थीती मोठया संख्येने होती. सुत्रसंचलन डॉ. डी. बी. जाधव यांनी आभार डॉ. राहुल साळवे यांनी मानले.

## महाशिवरात्री व संताजी महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त संगीत शिवमहापुराण कथा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील ग्रामदैवत असलेल्या श्री भामेश्वर मंदिरात महाशिवरात्री महोत्सव व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त दि. ८ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी दरम्यान संगीत शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.



श्री भामेश्वर मंदिर येथे गेल्या तीन दशकांपासून महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन केले जाते प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही महाशिवरात्री व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी अशा संयुक्त महोत्सवाचे निमित्त प्रसिद्ध कथाकार ह.भ.प. भक्तीदिदी पांचाळ (आळंदी) यांच्या रसाळ वाणीतून संगीत शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांना संगीतसाथ ह.भ. प. सुरेश महाराज पांचाळ ह. भ. प. प्रतिक महाराज विद्यालय पांचाळ ह. भ. प. संगीताताई सोळसकर ह.भ.प.राजू महाराज शिंदे व ह. भ. प. आनंद महाराज गाडे करणार आहेत. ह. भ. प. भक्तीदिदी पांचाळ यांच्या रसाळ वाणीतून दररोज रात्री ७ ते १० यावेळेत कथा होणार आहे. संगीत शिवमहापुराण कथा दि.८ ते १४ फेब्रुवारी पर्यंत होणार असून दि. १५ फेब्रुवारी रोजी रात्री शिव महाशिवरात्री निमित्त १० ते १२ ह. भ. प. राधाताई महाराज (संत मिराबाई संस्थान महासांगवी) यांचे कीर्तन होणार आहे. तर दि. १६ रोजी सकाळी ८ ते ११ शिवप्रतिमा व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेची छत्रपती शिवाजी महाराज चौकातून शोभायात्रा निघणार आहे. यानंतर सकाळी ११ ते १ ह. भ. प. सतिश महाराज उरणकर (श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान पाटोदा) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर कै. पोपट शिंदे यांचे स्मरणार्थ शिंदे परिवारातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या शिवमहापुराण कथा, कीर्तन व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन भामेश्वर मित्र मंडळ व संताजी युवक मंडळ कडून करण्यात आले आहे.

## विश्वाला अहिंसा व शांततेचा संदेश देणारे महान गुरु म्हणजे महात्मा गांधी - डॉ.अनंत मरकाळे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व इतिहास विभागाच्या वतीने महात्मा गांधी व्यक्ती आणि कार्य या विषयावर डॉ. अनंत मरकाळे यांनी संवाद साधताना सांगितले की विश्वाला शांततेचा संदेश देणारे महात्मा गांधी हे थोर महात्मा होते. अहिंसेच्या मार्गाने जग जिंकता येते तसेच प्राणी मात्रांवर प्रेम करायला सांगणारे महात्मा गांधी जीवनाचे तत्त्वज्ञान शिकवितात. स्वातंत्र्यसंग्रामामध्ये विविध प्रकारच्या भूमिका घेऊन सरकारला वेठीस धरणारे महात्मा गांधी जनतेच्या विश्वासाने महान झाले. महात्मा गांधीजींच्या हाकेवर संपूर्ण जनता एक होत होती. यामुळे आजच्या



काळातही गांधीजींच्या विचारांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. व्याख्यानमालेचे अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी महात्मा गांधीजींच्या विचार आजही प्रत्येकाला गतिमान बनवते. यामुळे महात्मा गांधी स्वदेशीचा पुरस्कार करणारे, देशाभिमान जागविणारे थोर स्वातंत्र्य सेनानी होते असे सांगितले. याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, ईश्वर खामकर, महादेव गायके, राम नांदुरे, माणिक पाटील यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल साळवे यांनी तर आभार प्रा. नागोराव वाघमारे यांनी मानले.

## वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाच्या क्रीडा संघात आदित्य कृषी महाविद्यालयाचा डंका

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रीडा क्षेत्रात आपला कायम दबदबा निर्माण करणाऱ्या आदित्य शिक्षण संस्था संचलित आदित्य कृषी महाविद्यालयाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या संघात पाच विद्यार्थ्यांची निवड घडवून आणत आपली गुणवत्ता अधोरेखित केली आहे. सातत्यपूर्ण मार्गदर्शन, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांची जिद्द यामुळे आदित्यचा डंका विद्यापीठ स्तरावरही घुमत आहे. विद्यापीठ स्तरावरील खो-खो आणि कबड्डी या प्रमुख खेळांच्या संघांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. खो-खो संघात तीन तर कबड्डी संघात दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.




या निवडीबद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थांचे अभिनंदन केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये कबड्डी संघासाठी कुंभार सुगंधा व खेडकर मनीषा तर खो-खो संघात शेंडे सौरव, श्रीराम सानिका आणि वाघमारे शैलजा यांना संधी मिळाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे प्राध्यापकांचे मार्गदर्शन, क्रीडा शिक्षकांचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत महत्त्वाची ठरली आहे. आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदिती सारडा विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना म्हणाल्या की ''विद्यार्थ्यांची निवड ही केवळ खेळातील कौशल्यावर आधारित नसून त्यांच्या शिस्त, सांघिक भावना आणि धैर्य या गुणांमुळे झाली आहे. महाविद्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर सर्व खेळाडूंचे अभिनंदन करण्यात आले असून आगामी आंतरविद्यापीठ स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. हे खेळाडू विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना उत्कृष्ट कामगिरी करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**विद्यार्थ्यांची जिद्द, कठोर परिश्रमामुळे यश**

आमचे विद्यार्थी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही सातत्याने आपली छाप पाडत आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची जिद्द, कठोर परिश्रम आणि क्रीडा शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आहे. आगामी स्पर्धांमध्येही ते निश्चितच उज्ज्वल कामगिरी करतील, असा आम्हाला विश्वास आहे.''

- प्राचार्य शाम भुतडा, आदित्य कृषी महाविद्यालय, बीड

### सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आईसाहेब संस्थेच्या वतीने डॉ. तांदळे सन्मानित

पाटोदा । प्रतिनिधी

श्री संत मीराबाई आईसाहेब पुण्यतिथी सोहळा निमित्त महासांगवी येथे दि. २४ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व वाल्मिकी रामायण कथेचे आयोजन करण्यात आले होते. दि. ३१ जानेवारी २०२६ शनिवार रोजी महंत राधाताई महाराज आईसाहेब यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली. काल्याच्या कीर्तनास पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. काल्याचे किर्तन समाप्तीनंतर कार्यक्रमात मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. यात सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ. संजय तांदळे यांचा ह भ प महंत राधाताई महाराज आईसाहेब व आष्टी चे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विठ्ठल तांदळे, प्राचार्य डी.जी. तांदळे, संतोष गर्जे ,बाजीराव ढाकणे, हिरामण तांदळे, प्राचार्य बाळासाहेब नागरगोजे, प्राचार्य राजकुमार कदम, प्रा.अशोक नागरगोजे,ॲड.जयंत राख, स्वामी सानप आदींची उपस्थिती होती. पुरस्कार प्राप्तीनंतर बीड येथे दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी डॉ. संजय तांदळे यांचा पाडळी चे मा.सरपंच रामदास हंगे, वरद डेव्हलपर्स चे उत्तम मिसाळ, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस उपनिरीक्षक वसुदेव मिसाळ, गणेश सानप, स्वाती सानप, लक्ष्मण चाटे ,पांडुरंग जायभाये, बी.बी. जायभये, सुदाम कोळेकर, डॉ. लक्ष्मण पवळ, पोलीस उपनिरीक्षक राजू गुळभिले,अभिजीत वैद्य, राजू वंजारे ,छाया सरोदे, चौरे हार्डवेअरचे चौरे एस बी आदींनी पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

**टी.सी.हरवला आहे**

पाटोदा ते मांजरसुंबा प्रवास दरम्यान विद्यार्थी पास हरवला आहे सापडल्यास खालील पत्त्यावर किंवा संपर्क करावा
सुरेश गणेश बांगर
मु पो येवलवाडी तालुका पाटोदा जिल्हा बीड
९७६७११३१३४

# शेत पाणंद रस्ते दिसणार आता ऑनलाईन

## योजना राबवण्यासाठी प्रांताधिकाऱ्यांना मिळाले विशेष अधिकार

पुणे : राज्य सरकारने पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेतून स्वतंत्र मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. हे रस्ते नकाशांवरून सातबारा उताऱ्यावरही येणार आहेत. आता या रस्त्यांचे जाळे एकाच संकेतस्थळावर आणि पोर्टलवर दिसणार आहे. कोणत्या गावात किती रस्ते आहेत, त्याची स्थिती काय आहे, कोणत्या रस्त्यावर अतिक्रमण आहे, कोणत्या रस्त्याचे काम सुरू आहे, त्यासाठी किती निधी आहे, याची इत्थंभूत माहिती यावर उपलब्ध असणार आहे. तसेच या कामाबाबत शेतकऱ्यांनाही आपला अभिप्राय देता येणार असून जिल्हाधिकाऱ्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही या कामावर लक्ष ठेवता येणार आहे.



शेतकऱ्यांसाठी पेरणी आंतरमशागत, कापणी, मळणी या कामांसाठी तसेच शेतीमाल बाजारात पोहोचविण्यासाठी बारमाही रस्ते असणे आवश्यक असतात. अनेक ठिकाणी अशा रस्त्यांवर अतिक्रमण झाले असून त्यांची गुणवत्ता पुरेशी नसल्याने शेतकऱ्यांना मोठी समस्या जाणवते. या पार्श्वभूमीवर शेतरस्ते, पाणंद रस्ते अधिक प्रभावीपणे सक्षम करण्याकरिता त्यांच्या मजबुती करण्याची योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेला मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना असे नाव देण्यात आले आहे. राज्यस्तरावर या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूलमंत्री, जिल्हास्तरावर पालकमंत्री आणि आमदारांच्या अध्यक्षतेखाली समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. ही योजना महसूल विभागामार्फत राबविण्यात येणार असून संबंधित ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद (बांधकाम विभाग), पंतप्रधान, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग आणि वन विभाग या यंत्रणा कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करणार आहेत. ही योजना राबवण्यासाठी प्रांताधिकाऱ्यांना पहिल्यांदाच विशेष अधिकार देण्यात आले आहेत. यापूर्वी प्रांताधिकाऱ्यांना भूसंपादनाचे निवाडे अर्थात मोबदला वाटप करणे, वेगवेगळे दाखले देणे अशा स्वरूपाचे काम दिले जात होते.

राज्यातील ही पहिली योजना असून प्रांताधिकारी या योजनेचे सर्वेसर्वा असतील. भूमी अभिलेख विभागाने या संदर्भात एका स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती करण्याचे ठरविले आहे. यावर ऑनलाइन निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे. या कामाचे कार्यादेशही ऑनलाइनच काढण्यात येणार असून त्याचे वेगवेगळे टप्पे या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

## साठवणूकीत कडधान्यांना लागणाऱ्या किडीचे कारण आणि उपाय

कडधान्याला किड लागण्याची कारणे साठवणूकीत कडधान्याचे नुकसान करणाऱ्या भुंगेऱ्यांचा प्रादुर्भाव शेतात पीक परिपक्व झाल्यापासूनच दिसून येतो. ही कीड पक्व झालेल्या शेंगा अथवा दाण्यावर आपली अंडी घालते व अळी प्रादुर्भावग्रस्त पिकाची मळणी केल्यास ही कीड साठवणुकीत येऊन कडधान्याचे नुकसान करते. धान्य साठवणुकीतील जागेत असलेल्या भेगा फटीमध्ये वास्तव्य करणारे भुंगेरे नवीन धान्याला क्षतीग्रस्त करतात. जुनी पोती व साठवणुकीच्या साधनांमार्फतसुध्दा या किडींचा प्रसार होतो. पोत्याच्या किंवा जुन्या साठवणूकीच्या कोपऱ्यात हे किडे वास्तव्य करतात. वाहतूकीची साधणे जसे बैलगाडी, ट्रेलर किंवा ट्रॅक्टर ट्रॉलीपासूनही या किडींचा प्रसार होतो.




साठवणुकीचा विचार केल्यास कडधान्याला इतर धान्याच्या तुलनेत किडींचा जास्त प्रादुर्भाव होतो. मूग, उडीद, तूर, वाटाणा, रंगाचे २ ठिपके असतात. या भुंगेऱ्याची मादी कडधान्यावर एक एक करून जवळजवळ ९० अंडी देते. अंडी अवस्था ४ ते ५ दिवस असते. चवळी तसेच हरभरा या कडधान्यात कॅलासोब्रुकस भुंगेरा अतोनात नुकसान करतो. पूर्ण वाढलेला भुंगेरा गडद चॉकलेटी रंगाचा ६ ते ७ मिमी लांब असतो. फुगीर लांबट गोल भुंगेऱ्याच्या पाठीवर राखाडी या किडीची अळी गुबगुबीत पांढऱ्या रंगाची सुरकुत्या असलेली असते. अळी धान्यात शिरून उपजिवीका करते. अळी अवस्था १५ ते २० दिवसात पूर्ण होते. कोषावस्था ४ ते ८ दिवसात दाण्याच्या आत पूर्ण होते. पूर्ण वाढलेला भुंगेरा दाण्यास छिद्र पाडून बाहेर येतो. प्रौढ भुंगेरा साधारणतः १० दिवस जगतो. प्रौढ भुंगेऱ्याला पंख असल्यामुळे कोठारापासून उडून शेतात जातो व कापणीआधी किंवा कापणीनंतर धान्यावर किंवा शेंगावर अंडी घालतो.

अशी घ्या काळजी : कापणीनंतर धान्य खळ्यात किंवा शेतात असल्यास त्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्क्यांच्यावर असते. या कालावधीत तापमान जवळपास ३० अं. सेल्सिअस तर हवेतील आर्द्रता ७५ टक्क्याच्या वर असते. या बाबी कीड व रोगाच्या वाढीला अतिशय अनुकूल असल्याने किडींचा प्रादुर्भाव वाढतो. बुरशीची वाढ झाल्यामुळे तूर हे कडधान्य टणक होते व लवकर शिजत नाही. तूरीच्या पेंड्यांना बुरशीपासून वाचविण्यासाठी त्या शेतात किंवा खळ्यात उभ्या करून ठेवाव्या. पेंड्या बांधतांना थोड्या सैल बांधल्यास हवा खेळती राहून धान्य लवकर वाळण्यास मदत होते व बुरशीचा प्रादुर्भावही टाळता येतो. ज्या कडधान्याच्या पेंड्या बांधणे शक्य होत नाही. उदा. उडीद, मूग, चवळी त्यांना टणक कोरड्या उंचवट्याच्या जागेवर साठवून नियमितपणे त्यांची उलटणी करत रहावी. खरीप मूग व उडीद कापणीच्या वेळेस ओलसर वातावरण असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. ते टाळण्यासाठी शेतात गरजेनुसार ५४५ मी ते १०१५ मी. आकाराचे ओटे तयार करून तात्पुरत्या तंबू किंवा प्लास्टिक आच्छादनाची व्यवस्था करणे महत्वाचे ठरते.

## जनावरांच्या आहारात 'लोह' चा समावेश असणे गरजेचे

शेतकरी शेतीसोबत जोडव्यवसाय म्हणून पशुपालन करतात. या व्यवसायामध्ये चांगले उत्पादन मिळवण्यासाठी तसेच जनावरांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी शेतकऱ्यांना वेगवेगळ्या गोष्टींची काळजी घ्यावी लागते. यामध्ये एक महत्वाचा घटक म्हणजे आहार. जनावरांच्या आहारात वेगवेगळी जीवनसत्वे वेगवेगळी कार्ये करतात. जनावरांच्या आहारातील लोह या जीवनसत्त्वाचे महत्व अत्यंत आवश्यक असून, त्याबाबत शेतकऱ्यांनी माहिती घेणे गरजेचे आहे.



जनावरांच्या आरोग्यात लोहाचे महत्व : जनावरांच्या आहारात लोहाचा वापर असणे गरजेचे असते. महत्त्वाचे म्हणजे जनावरांच्या शरीरातील लोहाची पातळी केवळ शोषणाद्वारे नियंत्रित केली जाते. जनावरांच्या शरीरातील लोह उत्सर्जनाची यंत्रणा ही एक अनियंत्रित प्रक्रिया आहे जी घाम येणे, केस आणि त्वचेच्या पेशी गळणे आणि एन्टरोसाइट्सचे जलद उलाढाल आणि उत्सर्जन या द्वारे होते.

लोह खालील प्रमाणे महत्त्वाचे कार्य करते : लोह रक्तातील साखरेचे ऊर्जेमध्ये रूपांतर करण्यास मदत करते. लोह जनावरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. निरोगी त्वचा, केस आणि नखांसाठी महत्त्वाचे आहे. लोह हे रक्त निर्मितीसाठी आवश्यक घटक आहे. जनावरांच्या शरीरातील सुमारे ७० टक्के लोह रक्तातील हिमोग्लोबीन नावाच्या लाल रक्तपेशींमध्ये आणि मायोग्लोबिन नावाच्या स्नायूंच्या पेशींमध्ये आढळते. रक्तातील ऑक्सिजन फुफ्फुसातून उतींमध्ये हस्तांतरित करण्यासाठी हिमोग्लोबीन आवश्यक आहे.

लोहाच्या कमतरतेमुळे जाणवणारी लक्षणे : लोहाच्या कमतरतेमुळे स्वंथ करणाऱ्या जनावरांमध्ये अत्यंत थकवा, अशक्तपणा येतो, त्वचा फिकट होते, छातीत दुखणे, जलद हृदयाचा ठोका होणे किंवा श्वास लागणे इत्यादी लक्षणे उद्भवतात. पाय थंड होणे, जिभेची जळजळ किंवा वेदना होणे, नखे ठिसूळ होणे इत्यादी लक्षणे दिसून येतात. वराह व त्यांच्या पिल्लांना पिगलेट ॲनिमिया आजार होतो.आहार व्यवस्थापन : जनावराला खाद्यातून नियमित लोह युक्त क्षार मिश्रणे द्या. मोठ्या जनावरांत ५० ते १०० ग्रॅम, तर लहान जनावरांत १५ ग्रॅम ते २० ग्रॅम हे प्रमाण ठेवा. जनावराला पालेदार चारा विशेषतः द्विदल चारा त्यांच्या वजनाप्रमाणे द्या. आहारात लोह असलेले पदार्थ जास्त खायला द्या. पशुआहारात जीवनसत्त्व 'क' असलेले अधिक अन्न पदार्थ समाविष्ट करा. कारण ते शरीरात लोह शोषण्यास मदत करते.

# घराच्या घरी तयार करा विद्राव्य कॅल्शियम ; पिकाच्या प्रजोत्पादक काळात ठरते संजीवनी

कॅल्शियम जसे मानवी शरीराकरिता महत्वाचे असते त्याचप्रमाणे पिकांकरिता देखील महत्वाचे असते. घराच्या घरी विद्राव्य कॅल्शियम तयार केल्यास याचा खर्च वाचतो आणि पिकांनाही फायदा होतो.




साहित्य : बंड्याची टरफले / शंख शिंपले. व्हिनेगर. खलबत्ता. द्रावण बनविण्यासाठी पात्र प्लास्टिक किंवा काचेचे (किती प्रमाणात बनवणार आहात त्यानुसार योग्य आकाराचे). स्वच्छ सछिद्र कापड किंवा कागद (पात्राच्या तोंडावर झाकण्यासाठी). रबर बँड अथवा दोरी. पात्राच्या तोंडाला बांधण्यासाठी खलबत्ता. भारतामधे स्वयंपाकात सर्रास वापरला जाणारा व्हिनेगर हा द्रव पदार्थ म्हणजे फळे किंवा फळांच्या रसात खमीर (यीस्ट) मिसळून किण्वन प्रक्रियेने तयार होणारा आंबट आम्लधर्मीय द्रव पदार्थ आहे. शहरी भागात यास व्हिनेगर तर बऱ्याच भागात यास सिरका किंवा शिरका असेही म्हणतात. आम्लधर्मीय गुणधर्मामुळे हा उत्तम द्रावक (विरघळवून घेणारा) आहे. अंड्याची टरफले व शंख शिंपले यातील कॅल्शीयम विरघळून घेण्यासाठी याचा वापर केलेला आहे.

व्हिनेगर हे सहजासहजी उपलब्ध होते. विशेषत: लोणची, पापड, मसाले विक्रेत्यांकडे हे उपलब्ध असते. सफरचंदापासून बनवलेले ॲपल व्हिनेगर, तांदुळापसून बनवलेले राईस व्हिनेगर अशा विविध प्रकारात हे उपलब्ध आहे. या साहित्यातील विनेगर हा एकमेव घटक बाजारातून विकत घ्यावा लागणारा व काहीसा खर्चिक आहे. परंतु या निविष्टेचे परीणाम व उपयुक्तता पाहता हा खर्च नगण्य आहे. बनवण्याची प्रक्रिया : अंड्याच्या टरफलाच्या आतील बाजूचा पापुद्र्यासारखा भाग काढून टाका. यामुळे कॅल्शियम व्यतिरीक्त कोणताही घटक शिल्लक राहाणार नाही. अंड्याची टरफले किंवा शंख शिंपले खलबत्त्यात कुटुन बारीक तुकडे करा (भुकटी करू नये). तुकडे केल्याने अभिक्रिया वेगाने होते. कुटलेले तुकडे तव्यावर हलके भाजून घ्या, ज्यामुळे या तुकडांवर चिकटलेले अनावश्यक जैविक पदार्थ नष्ट होतील. पात्रात व्हिनेगर घेऊन त्यात अंड्याची टरफले किंवा शंख शिंपल्याचे तुकडे हळूहळू सोडा. व्हिनेगर संपर्कात येताच हे तुकडे बुडबुडे उत्सर्जित करायला सुरवात करतील व पात्रात वरखाली होतील. हळूहळू सोडण्याचा उद्देश असा की सर्व तुकडे व्हिनेगर मधे एकत्र टाकल्यास द्रावण फेसाळून पात्रातून उतू जाण्याची शक्यता असते. टरफले व शिंपले विनेगर मधे फेसाळून हळूहळू विरघळतील. या प्रक्रियेस २ ते ३ दिवस लागू शकतात. यादरम्यान पात्राच्या तोंडाला स्वच्छ कापड किंवा कागद रबर बँड अथवा दोरीने बांधून सामान्य तापमान व सावलीच्या ठिकाणी ठेवावे व रोज निरीक्षण करावे. जेंव्हा या द्रावणात टरफले किंवा शिंपले टाकल्या नंतरही ते फेसाळले नाहीत याचा अर्थ या द्रावणात आता आणखी कॅल्शियम विरघळण्याची सामावून घेण्याची शक्यता नाही व कॅल्शियम संपृक्त द्रावण तयार आहे.वारण्याची पद्धत : हे द्रावण पिकावर केवळ फवारणी साठी वापरायचे आहे. फवारणीसाठी १ लिटर पाण्यात १ मिली विद्राव्य कॅल्शियम मिसळावे. विद्राव्य कॅल्शियम फॉस्फेट, फरमेंटेड प्लांट ज्युस, किवा जडीबूटी संजीवक यांबरोबर पाण्यात मिसळून फवारणी केली जाऊ शकते. प्राथमिक अवस्थेत पिकाची कमजोर शारीरीक वाढ, पाने रंगहीन होणे व चकाकी नसणे, फुलांचा बहर कमजोर होऊन फुलगळ होणे, केवळ शाखीय वाढ होऊन फळांची वाढ न होणे, फळांमधे शर्करेचे (साखर) प्रमाण कमी असणे, अशा अवस्थेत विद्राव्य कॅल्शियमची फवारणी अत्यंत लाभदायक आहे. फुलांचा बहर व फळधारणेच्या काळात फवारणीने शाखीय वाढ थांबून उपलब्ध अन्नद्रव्य केवळ फुले व फळांच्या वाढीसाठी उपलब्ध केले जाते. परीणामी फळ उत्पादनात लक्षणीय वाढ होते. विद्राव्य कॅल्शियम फॉस्फेट, फरमेंटेड प्लांट ज्युस(), किवा जडीबूटी संजीवक यांबरोबर पाण्यात मिसळून फवारणी केल्यास फळांच्या रंग, चव व सुगंध यात अप्रतिम परीणाम दिसून येतात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजी महाराजांनी सूर्यग्रहणाच्या निमित्ताने राजमाता जिजाऊ व सोनोपंत विश्वनाथ डबीर यांची सुवर्णतुला केली. श्री क्षेत्र महाबळेश्वर येथील देवळासमोर ही सुवर्णतुला झाली.
१६७३ : कोंडाजी फर्जंद यांनी अवघ्या ६० मावळ्यांनिशी पन्हाळा जिंकुन महाराजांचे १३ वर्षे अपुर्ण असलेले स्वप्न पूर्ण केले.
१८३२ : पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी इंग्रजी व मराठीतील पहिले साप्ताहिक वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले.
१८३८ : सॅम्युअल मॉर्स यांनी तारयंत्राचा शोध लावला.
१९०७ : मारिया मॉंटेसरी यांनी पहिली मॉंटेसरी शाळा सुरूकेली. त्यांच्या शाळांमुळे पूर्वप्राथमिक शिक्षणात आमूलाग्र बदल झाला.
१९१२ : न्यू मेक्सिको हे अमेरिकेचे ४७ वे राज्य बनले.
१९२४ : राजकारणात भाग न घेणे व रत्नागिरी जिल्ह्यातच राहणे या अटींवर स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जन्मठेपेतुन सशर्त मुक्तता
१९२९ : गोरगरिब व रुग्णांची सेवा करण्यासाठी मदर तेरेसा यांचे कोलकाता येथे आगमन
१९४४ : दुसरे महायुद्ध रशियन सैन्य पोलंडमध्ये शिरले.
१९४६ : आजच्या दिवशी विएतनाम येथे पहिल्या सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या.
१९८९ : केहर सिंह आणि सतवंत सिंह यांना इंदिरा गांधींच्या हत्या करण्याच्या गुन्हात फाशीची शिक्षा देण्यात आली.
१९९४ : सिडनी टेस्ट सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या टीम ने ऑस्ट्रेलिया च्या टीम ला ५ रन नी हरविले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४१२ : फ्रान्सला परकीय जोखडातून मुक्त करणार्या 'जोन ऑफ आर्क'चा जन्म. तिला चेटकीण ठरवून जाळण्यात आले. नंतर मात्र तिला संत ठरवले गेले. ती 'द मेड ऑफ ऑर्लिन्स' या टोपणनावानेही ओळखली जाते. (मृत्यू: ३० मे १४३१)
१७४५ : बलूनच्यासहाय्याने आकाशात उडण्याचे प्रयोग करणाऱ्या जाक्कास एलियन मॉंटगोल्फिएर यांचा जन्म.
१८१२ : बाळशास्त्री जांभेकर मराठी पत्रकारितेचे पितामह, १८३२ मधे 'दर्पण' हे वृत्तपत्र काढून त्यांनी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. 'दिग्दर्शन' हे मराठीतील पहिले मासिकही त्यांनीच १८४० मधे सुरू केले. (मृत्यू: १८ मे १८४६)
१८२२ : उत्खनन करून ट्रॉय आणि मायसेनी या नगरीचा शोध लावणाऱ्या हेन्रीचा श्लीमन यांचा जन्म.
१८६८ : गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे उर्फ 'दासगणू महाराज' आधुनिक संतकवी, 'भक्तिरसामृत', 'भक्तकथामृत' आणि 'संतकथामृत' हे त्यांचे संतचरित्रात्मक ग्रंथ आहेत. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९६२)
१८८३ : खलील जिब्रान लेबनॉनमधे जन्मलेले अमेरिकन कवी, लेखक व कलाकार (मृत्यू: १० एप्रिल १९३१)
१९१० : ला प्रसिद्ध भारतीय गायक जी. एन. बालासुब्रमनियम यांचा जन्म.
१९१८ : ला भारतीय प्रसिद्ध गायक भारत व्यास यांचा जन्म.
१९२५ : रमेश मंत्री प्रवासवर्णनकार, कथाकार, विनोदी लेखक (मृत्यू: १९ जून १९९८)
१९२८ : नाटककार, चित्रपटकथालेखक, पत्रकार व साहित्यिक विजय तेंडुलकर यांचा जन्म. (मृत्यू: १९ मे २००८ पुणे, महाराष्ट्र)
१९३१ : डॉ. आर. डी. देशपांडे पर्यावरण क्षेत्रातील शा'स्त्रज्ञ, 'महाराष्ट्र असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स'चे (आघारकर रिसर्च इन्स्टिट्युट) अध्यक्ष
१९४० : प्रसिद्ध भारतीय लेखक नरेंद्र कोहली यांचा जन्म.
१९४९ : परमवीर चक्राने सन्मानित सुभेदार बाना सिंग यांचा जन्म.
१९५५ : रोवान ॲटकिन्सन विनोदी अभिनेते व पटकथालेखक
१९५९ : कपिल देव निखंज भारतीय क्रिकेटकप्तान, समालोचक व प्रशिक्षक
१९६५ : हिमाचल प्रदेश चे १४ वे मुख्यमंत्री जय राम ठाकूर यांचा जन्म.
१९६७ : ऑस्कर पुरस्कार विजेते जगप्रसिद्ध गायक ए. आर. रेहमान यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९६ : जिवबा दादा बक्षी महादजी शिंदे यांचे सेनापती, मुत्सद्दी (जन्म:)
१८४७ : त्यागराज दाक्षिणात्य संगीतकार (जन्म: ४ मे १७६७)
१८५२ : लुई ब्रेल अंधांना उपयोगी पडणाऱ्या ब्रेल लिपीचे जनक व शिक्षक (जन्म: ४ जानेवारी १८०९)
१८८४ : ग्रेगोर मेंडेल जनुकांची संकल्पना मांडणारा जर्मन जीवशास्त्रज्ञ (जन्म: २० जुलै १८२२)
१८८५ : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (जन्म: ९ सप्टेंबर १८५०)
१९१८ : जी. कँटर जर्मन गणितज्ञ (जन्म: ३ मार्च १८४५)
१९१९ : थिओडोर रुझवेल्ट अमेरिकेचे २६ वे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २७ आक्टोबर १८५८)
१९७१ : प्रफुल्लचंद्र तथा पी. सी. सरकार जादूगार (जन्म: २३ फेब्रुवारी १९१३)
१९८१ : ए. जे. क्रोनिन स्कॉटिश लेखक (जन्म: १९ जुलै १८९६)
१९८४ : 'विद्यानिधी' सिद्धेश्वरशास्त्री विष्णू चित्राव महामहोपाध्याय, वैदिक साहित्याचे अभ्यासक व मराठी कोशकार (जन्म: १ फेब्रुवारी १८८४)
२००८ : भारतीय ऑर्थोपेडिक सर्जन प्रमोद करन सेठी यांचे निधन.
२००९ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री गुलाम मोहम्मद शाह यांचे निधन.
२०१० : प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे लेखक व इंग्रजीचे प्राध्यापक (जन्म: १६ जुलै १९४३)
२०१७ : भारतीय अभिनेता ओम पुरी यांचे निधन.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# कुठलेही दडपण न टाकता मुलांना हसत खेळत शिकू द्या- केदार कुलकर्णी

अंबड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी वार्षिक स्नेह संमेलनासारखे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम उपयुक्त ठरतात.तसेच पुस्तकी अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी विविध कला,छंद जोपासावेत असे आवाहन करतांनाच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कौतुकास्पद काम महात्मा फुले इंग्लिश स्कुल नेहमीच करत असते.पालकांनी दडपण न आणता मुलांना हसत खेळत शिकू द्यावे असे मत अंबडचे नगरसेवक केदार दादा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. अंबड शहरातील महात्मा फुले व स्मार्ट किडस वर्ड इंग्लिश स्कुलच्या शनिवारी आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन नगरसेवक केदार दादा कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून एसबीआय बँकेचे शाखाधिकारी कैशीक चौधरी,भाजपा जेष्ठ नेते डॉ.राजेंद्र ठोसर,माजी नगरसेवक कुमार रुपवते,नगरसेवक गंगाधर वराडे,नगरसेवक सौरभ कुलकर्णी,केंद्र प्रमुख माने सर ,यशवंत व्याख्यान मालेचे संजय खोरे, अंबड वार्ताचे बळीराम राऊत,बाबासाहेब सोळुंके आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलतांना केदार कुलकर्णी म्हणाले की, कोणत्याही मुलाची पहिली शाळा हे त्याचे घर असते आणि पहिले शिक्षक हे त्याचे पालक असतात. सुरुवातीच्या काळात कोणतेही मूल आपल्या पालकांकडूनच सर्व कामे करायला शिकते, जर तुम्हाला तुमच्या मुलाचे भविष्य चांगले घडवायचे असेल तर त्यांना नेहमीच चांगले शिक्षण द्या.आजच्या पालकामध्ये शिक्षणाविषयी आवड आहे त्यामुळे प्रत्येक पालक आपल्या मुलांकडून काही तरी आपेक्षा धरुन आहे मात्र पालकांनी आपल्या मुलांवर जास्त दडपण न टाकता त्यांला मुक्त पणे त्यांच्या मनाप्रामाणे जगू दिले पाहिजे,हे वय मुलांचे खेळण्या बागडण्याचे आहे त्यामुळे मुलांना हसत खेळत शिकू द्या असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी भारतीय स्टेट बँकेचे शाखाधिकारी कैशिक चौधरी व भाजपाचे जेष्ठ नेते डॉ.राजेंद्र ठोसर यांनीही मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात संस्थाध्यक्ष गिताराम मते यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा मांडला तसेच विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्याचे काम आम्ही असेच प्रामाणिकपणे करत राहू अशी ग्वाही दिली. यावेळी वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात देवा श्री गणेशा,वारकरी दिंडी,फनी डान्स, देशभक्तीपर गाणे,शेतकरी गित अशी अनेक गाणे विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे सादर केली.यामध्ये तान्हाजी मालुसरे यांची लढाई तसेच देशाच्या एकात्मतेवरील नृत्यकला लक्षवेधी ठरल्या. या कार्यक्रमांचे सुत्रसंचालन स्वाती जंगले व उज्वल सावंत यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्या सविता मते,शबनम शेख,साधना शिंदे,सोनाली जैन,आश्विनी जानवे,गायत्री पाटील,कोमल देवडे,वैष्णवी गायकवाड,वैभवी पडूळ,कोमल ऊगले, यांच्यासह बाबासाहेब जावळे,शिवराज मते,संजय परदेशी आदींनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह विद्यार्थी व पालकांची मोठी उपस्थिती होती. कोरोनामध्ये पालक गमावलेल्या मुलांसह आत्महत्याग्रस्त शेतक-यांची मुले तसेच जे पालक मुलांची शैक्षणिक फिस भरु शकत नाही अशा गरीब मुलांना महात्मा फुले इंग्लिश स्कुलमध्ये मोफत प्रवेश देवून त्यांच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च संस्था करत असून सद्यस्थितीमध्ये या शाळेत अशी १७ मुले मोफत शिक्षण घेत आहेत असे संस्थाध्यक्ष यांनी यावेळी सांगितले कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्व.अजीतदादा पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली यावेळी अजीजदादा यांचा आवाजातील वरील ऑडीओ लावण्यात आला होता यावेळी संपुर्ण सभागृह भावूक झाले होते.अनेकांच्या डोळयात पाणी आले.

## रस्ते अपघातांचे विश्लेषण करून तातडीच्या उपाययोजना करा–जिल्हाधिकारी



जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यात दरमहा होणाऱ्या रस्ते अपघातांचे सखोल विश्लेषण करून ते तातडीने कमी करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून त्या बोलत होत्या.बैठकीस उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल, मोटर वाहन निरीक्षक भीमराव नागरे, कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग सा. बां. वि.क्रमांक १ ) स्मिता पवार, पोलीस उपअधीक्षक रविंद्र निकाळजे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील तसेच जालना शहरातील अपघातप्रवण स्थळांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. या ठिकाणी आवश्यक सूचक व चेतावणी फलक त्वरित बसविण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी दिल्या. सन २०२५ मध्ये जिल्ह्यात एकूण ७५६ रस्ते अपघात घडले असून, त्यापैकी ३१८ अपघात जीवघेणे ठरले आहेत. या अपघातांमध्ये ३५५ नागरिकांचा मृत्यू झाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. अपघातांमध्ये मोठ्या प्रमाणावर दुचाकी वाहनांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले असून, दुचाकीस्वारांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेटचा सक्तीने वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. याशिवाय, जालना शहरासह जिल्ह्यातील महत्त्वाच्या अपघातप्रवण ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्तेवर () आधारित आयटीएमएस इंटिग्रेटेड ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत गॅन्ट्री प्रणाली बसविण्यात येणार आहे. या प्रणालीद्वारे विना हेल्मेट वाहन चालवणे, सीट बेल्ट न लावणे, वेगमर्यादा ओलांडणे तसेच सिग्नल तोडणे यांसारख्या वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर स्वयंचलित ई–चलान प्रणालीद्वारे दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. हा प्रकल्प जालना जिल्ह्यात लवकरच राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. रस्ते सुरक्षिततेसाठी नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन करावे आणि अपघातमुक्त जिल्हा घडविण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले.

# रेल्वे प्रकल्प पुर्ण करण्यावर खा.बजरंग सोनवणेंचा फोकस; केंद्रीय रेल्वेमंत्र्यांची घेतली भेट

### मराठवाड्यातील रखडलेले रेल्वे प्रकल्प मार्गी लावण्याची मागणी, रेल्वेमंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद

नवी दिल्ली । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघासह संपूर्ण मराठवाडा विभागातील रखडलेले व अत्यावश्यक रेल्वे प्रकल्प पुर्ण करून घेण्यावर खा.बजरंग सोनवणे यांनी फोकस केला आहे. रखडलेल्या रल्वेमार्गाचे काम मार्गी लावण्यासाठी संसद भवन, नवी दिल्ली येथे केंद्रीय रेल्वे, संचार व इलेक्ट्रॉनिक्स मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन खा.बजरंग सोनवणे यांनी सविस्तर चर्चा केली. या बैठकीत मराठवाड्याच्या दळणवळण विकासाशी संबंधित अनेक महत्त्वाचे विषय मांडण्यात आले.

यावेळी मराठवाड्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर या नवीन रेल्वेमार्गाचा मुद्दा बैठकीत अग्रक्रमाने मांडण्यात आला. मार्च २०२५ मध्ये या प्रकल्पाच्या सर्वेक्षणासाठी ६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल रेल्वेमंत्र्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. या प्रकल्पाचा डीपीआर तातडीने पूर्ण करून प्रशासकीय मान्यता देत प्रत्यक्ष काम सुरू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दरम्यान, घाटनांदूर रेल्वे स्टेशन व परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी काही महत्त्वाच्या गाड्यांना थांबा देण्याची मागणी पुन्हा मांडण्यात आली. यामध्ये औरंगाबाद–गुंटूर, बेंगळुरू–नांदेड, नांदेड–पनवेल या गाड्यांचा समावेश असून, कोविडपूर्वी असलेले थांबे पुन्हा सुरू करावेत, अशी मागणीही करण्यात आली. या सर्व विषयांवर अश्विनी वैष्णव यांनी गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना सकारात्मक कार्यवाहीचे निर्देश देण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थी, रुग्ण, व्यापारी तसेच नोकरदार वर्गाची वाढती गरज लक्षात घेता बीड–अहिल्यानगर–मुंबई व बीड–अहिल्यानगर–पुणे या मार्गांवर दररोज धावणाऱ्या इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या सेवांमुळे मराठवाड्याचा संपर्क थेट राज्याच्या प्रमुख शहरांशी मजबूत होणार असल्याचे सांगण्यात आले. या विषयावर सखोल चर्चा झाली. पूर्व बीड शहर तसेच ग्रामीण भागातील नागरिकांसाठी बार्शी नाका (बीड) परिसरात सुलभ ठिकाणी नवीन रेल्वे स्टेशन उभारण्याची गरज आहे, शिवाय नागरिकांची तशी मागणी देखील असल्याचे खा.सोनवणे यांनी केंद्रीय मंत्र्यांना सांगितले. या रेल्वे स्थानकामुळे प्रवास अधिक सोयीस्कर होऊन बीड शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. अहमदनगर–बीड–परळी रेल्वेमार्गावर अनेक ठिकाणी रेल्वे गेटमुळे सतत वाहतूक कोंडी होत असून अपघातांचाही धोका वाढला आहे. हा धोका कमी करण्यासाठी संबंधित ठिकाणी रोड ओव्हर ब्रिज व फूट ओव्हर ब्रिज उभारण्याची मागणी रेल्वेमंत्र्यांसमोर मांडण्यात आली.



मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी रेल्वे महत्वाची आहे. तर बीड जिल्ह्यातील नागरिकांचे रेल्वेचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी रेल्वे सुविधा वाढवण्याबाबत मी सातत्याने पाठपुरावा करत आहे. रेल्वेसाठी जे जे करावे लागेत, ते मी करेल आणि बीडचा रेल्वेचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रमाणिक प्रयत्न करत राहणार आहे.

–खा.बजरंग सोनवणे, लोकसभा सदस्य, बीड.

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या समस्यांकडे केंद्र सरकारने लक्ष द्यावे

### ऑल इंडिया ॲग्रो इनपुट डीलर्स असोसिएशनचे कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांना निवेदन

नवी दिल्ली । प्रतिनिधी

देशातील लाखो कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या व्यावहारिक अडचणी सोडवण्यासाठी आणि प्रस्तावित 'बियाणे विधेयक २०२५' व 'कीटकनाशक व्यवस्थापन विधेयक २०२५' मध्ये सुधारणा करण्यासाठी ऑल इंडिया ॲग्रो इनपुट डीलर्स असोसिएशनच्या वतीने केंद्रीय कृषिमंत्री माननीय शिवराजसिंह चौहान यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन देण्यात आले. या शिष्टमंडळात राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री, राष्ट्रीय कोषाध्यक्ष आबासाहेब भोकरे, मध्य प्रदेशाध्यक्ष मानसिंह राजपूत, महाराष्ट्र महासचिव विपिन कासलीवाल आणि मध्य प्रदेश संचालक देवेन वर्मा यांचा समावेश होता.



जबाबदारीचे स्पष्ट निर्धारण: विक्रेते कंपन्यांकडून आलेले 'सील्ड पॅक' मालच विकतात. त्यामुळे प्रयोगशाळा तपासणीत गुणवत्ता कमी आढळल्यास त्याची पूर्ण जबाबदारी उत्पादक कंपनीची असावी, विक्रेत्याची नाही. अवैध विक्रीवर कठोर निर्बंध: विनापरवाना बियाणे किंवा कीटकनाशके विकणाऱ्या घटकांमुळे वैध व्यावसायिकांचे नुकसान होते. अशा अवैध विक्रेत्यांवर कठोर सजा आणि दंड आकारण्याची मागणी करण्यात आली आहे. परवाना प्रक्रिया सुलभ करणे: राज्यांतर्गत व्यापाराचे ठिकाण बदलल्यास नवीन परवाना घेण्याऐवजी जुनाच परवाना स्थानांतरित करण्याची सोय मिळावी. तसेच, मुख्य परवान्यातच गोदामाचा पत्ता नोंदवून ते चालवण्याची परवानगी असावी. ॉमिनी (वारसदार) तरतूद: बँक खात्यांप्रमाणेच कृषी परवान्यात 'नॉमिनी' नोंदवण्याची सुविधा असावी. परवानाधारकाच्या निधनानंतर व्यवसाय बंद पडू नये, यासाठी वारसदाराला परवाना हस्तांतरित करण्याची आणि आधीच प्रशिक्षण घेण्याची मुभा मिळावी. या न्यायोचित मागण्यांचा विचार करून आगामी विधेयकांमध्ये त्यांचा समावेश करावा, जेणेकरून कृषी विक्रेत्यांना ईज ऑफ डूइंग बिझनेस चा प्रत्यक्ष लाभ मिळेल, अशी आशा राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन कलंत्री यांनी व्यक्त केली आहे. माननीय संपादक साहेब आपल्या लोकप्रिय दैनिकांमध्ये याला प्रसिद्धी द्यावी.

## शिक्षकांच्या मागणीसाठी सीईओंच्या दालनात ठिय्या

हिंगोली । प्रतिनिधी

सेनगाव तालुक्यातील हिवरखेडा जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. याविरोधात रिपब्लिकन सेनेने आक्रमक पवित्रा घेत थेट मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनातच ठिय्या आंदोलन केले.

युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाची प्रशासनाने गंभीर दखल घेतली. सीईओ विवेक गायकवाड यांनी संबंधित शाळेसाठी तत्काळ एक वाढीव शिक्षक देण्याची ग्वाही दिली. या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले. यापूर्वी दोनदा निवेदन देऊनही कार्यवाही झाली नव्हती. उर्वरित पदे लवकर न भरल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा घोंगडे यांनी दिला. यावेळी अमोल घोंगडे, भारत वाकळे, रवींद्र गडदे यांच्यासह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोतीराम अग्रवाल बँकेच्या वतीने नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार

जालना । प्रतिनिधी

मोतीराम अग्रवाल बँक परिवारातील प्रभाग क्र. ७ मधील नवनिर्वाचीत नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. राजेश राऊत व सौ. स्नेहलता विजय कामड हे जालना महानगर पालिका नवनिर्वाचीत नगरसेवक म्हणुन प्रभाग क्र. ७ मधुन निवडुन आल्याबद्दल त्यांचा पुष्पहार, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल, उपाध्यक्ष अनिल सोनी, संचालक मधुसुदन मुत्याल, श्री. अंकुशराव राऊत, श्री सुभाष , प्रदिप मुथा, विरेंद्र रुणवाल, ॲड. प्रविण लाहोटी, सी.ए. वरुण भक्कड बी.ओ.एम. सदस्य श्री राजेश कामड, विजय कामड बँकेचे सी.ई.ओ. कांचन केळकर, महा व्यवस्थापक राजेंद्र टोकशा, प्र. व्यवस्थापक आबासाहेब सोनवणे यांच्यासह सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. मा.ये.वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९०/२०२६**
**ॲड. उबाळे एम.आर. यांचे मार्फत**
**इंदुबाई मोरे वि. निरंक**

ज्यापेक्षा भिकाजी पि.आबाराव मोरे, हे दिनांक २५/०९/२०२४ रोजी नेकनुर ता. जि.बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

१. इंदुबाई भ्र. भिकाजी मोरे, वय. ८० वर्षे, धंदा. घरकाम, रा. नेकनुर, ता.जि. बीड, २. दिलीपकुमार पि. भिकाजीराव मोरे, वय. ५८ वर्षे, धंदा. शेती, रा. बार्शी रोड, स्वराज्य नगर, बीड, ता. जि. बीड, ३. किशोर पि. भिकाजी मोरे, ५५ वर्षे, धंदा. शेती, रा. सात्रा पोथरा, ता.जि.बीड, ४. छाया भ्र. अशोकराव जाधव, वय. ५२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. ज्ञानेश्वर कॉलनी, स्वराज्य नगर, बीड ता.जि.बीड, ५. पुष्पा भ्र. सुभाष यादव, वय. ५० वर्षे, धंदा. घरकाम, रा. महिंद्रा फॅक्टरी, भैसा अदिलाबाद, आंध्रप्रदेश

अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत, अर्जदार क्र. ४ व ५ या मयताच्या मुली आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे भिकाजी पि.आबाराव मोरे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २०/०२/२०२६ ही आहे.

आज दिनांक ०४ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित
**कनिष्ठ लिपिक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.

# नाशिकच्या 'णमोकार तीर्था'त भक्तीचा महाकुंभ

### ६ फेब्रुवारीपासून ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय पंचकल्याणक महोत्सव

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यातील मालसाने येथे श्रद्धा, वास्तुकला आणि अध्यात्माचा एक अपूर्व संगम पाहायला मिळणार आहे. मुंबई–आग्रा महामार्गावर (–०३) स्थित भव्य 'णमोकार तीर्थ' येथे आगामी ६ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'आंतरराष्ट्रीय ऐतिहासिक पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. १२५ एकर परिसरात पसरलेल्या 'पंचकल्याणक नगरात' आयोजित या महाकुंभात सुमारे ३००० जिनप्रतिमांची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. परम पूज्य आचार्य संघांचे पावन सान्निध्यहा महोत्सव साधना सम्राट गणाधिपति गणधराचार्य श्री १०८ कुंथुसागर जी महाराज यांच्या मंगल आशीर्वादाने आणि राष्ट्रसंत सारस्वताचार्य श्री १०८ देवनन्दीजी महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपन्न होईल. या ऐतिहासिक प्रसंगी देशभरातून ४०० हून अधिक साधू–साध्वींचे सान्निध्य लाभणार आहे, ज्यात प्रामुख्याने खालील आचार्य श्री सम्मिलित आहेत: आचार्य संघ: प.पू. आचार्य श्री पुष्पदंत सागरजी, पद्मनंदीजी, सिद्धांतसागरजी, कुमुदनंदीजी, विद्यानंदीजी, कर्मविजयनंदीजी, सुविधीसागरजी,



गुप्तीनंदीजी, सूर्यसागरजी, गुणधरनंदीजी, विनम्र सागरजी, जयसागरजी, प्रणाामसागरजी, प्रसन्नऋषिजी, दयाऋषींजी, गुलाबभूषणजी, तीर्थनंदीजी, सुयशगुप्तजी एवं गुणभद्रनंदीजी, श्रुतधरनंदीजी महाराज.

विशेष मार्गदर्शन: युगल मुनिश्री अमोघकीर्ती जी एवं मुनिश्री अमरकीर्ती जी महाराज.नऊ दिवसांचा सविस्तर कार्यक्रम ६ फेब्रुवारी (प्रथम दिवस): आचार्य निमंत्रण, रथयात्रा, मंडप उद्घाटन, ध्वजारोहण, पांडाल शुद्धी आणि चंद्रपुरी नगरी रचना विधीने भव्य शुभारंभ.७ फेब्रुवारी (द्वितीय दिवस): गर्भकल्याणक नित्य पूजन प्रवचन, घटपूजा, १६ स्वप्न दर्शन, गर्भकल्याणक संस्कार विधी. ८ फेब्रुवारी (तृतीय दिवस): जन्मकल्याणक – सौधर्म इंद्राचे आसन कंपायमान होणे, इंद्राद्वारे जीन बालक दर्शन, पांडूक शिलेवर अभिषेक आणि सांस्कृतिक कार्यक्रम. ९ फेब्रुवारी (चतुर्थ दिवस): जन्मकल्याणक (उत्तर रूप) – नामकरण, शृंगार, पाळणा आणि बाललीला कार्यक्रम.१० फेब्रुवारी (पंचम दिवस): दीक्षा कल्याणक (उत्तर रूप) – राजदरबार, राजतिलक, भगवंतांचा उपदेश, वैराग्य दीक्षा विधी संस्कार प्रवचन.११ फेब्रुवारी (सहावा दिवस): ज्ञान कल्याणक – आहार विधी, तप संस्कार, हवन पूजा, समवशरण प्राणप्रतिष्ठा आणि ग्लोबल महासभा अधिवेशन. १२ फेब्रुवारी (सातवा दिवस): ज्ञान कल्याणक – गणधराचार्य गुरुदेव पूजन, समवशरण प्राणप्रतिष्ठा, दिव्यध्वनी आणि शंका समाधान. १३ फेब्रुवारी (आठवा दिवस): मोक्षकल्याणक – केवळ ज्ञान कल्याणक पूजा, भगवंतांचे मोक्षगमन, अंतिम संस्कार, विश्वशांती महायज्ञ, निर्वाण लाडू अर्पण आणि महोत्सवाचा भव्य समारोप.विशेष: दुपारी २ वाजल्यापासून भगवंतांच्या प्रथम अभिषेकाने महामस्तकाभिषेक कार्यक्रम प्रारंभ होईल. हा सोहळा २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत निरंतर चालेल.णमोकार तीर्थाची भव्यता २ लाख स्क्वेअर फूट क्षेत्रात निर्मित हे तीर्थ जैन वारशाचा गौरव आहे. येथे १०८ फूट उंचीचे समवशरण मंदिर, भगवान चंद्रप्रभ यांची २७ फूट प्रतिमा, ५१ फूट अरिहंत देव प्रतिमा आणि अन्य ३१ फूट उंच परमेष्ठींच्या प्रतिमा बसवण्यात आल्या आहेत.

महोत्सव समिती आणि निमंत्रक या महा–आयोजनासाठी पंचकल्याणक समिती आणि आंतरराष्ट्रीय महामस्तकाभिषेक महोत्सव समितीच्या वतीने संतोष पेंढारी राष्ट्रीय अध्यक्ष, पंचकल्याणक समिती नीलम अजमेरा राष्ट्रीय संयोजक कमल ठोलिया राष्ट्रीय महामंत्री बालब्रह्मचारी वैशाली दिदी राष्ट्रीय संयोजिका मुकेश रावका स्वागत अध्यक्ष दिनेश शेठी राष्ट्रीय अध्यक्ष महावीर गंगवाल उपाध्यक्ष, पारस लोहाडे राष्ट्रीय अध्यक्ष, प्रचार प्रसार समिती ट्रस्टी बाबुभाई गांधी विजय लोहाडे . पवन पाटणी संतोष काला, भूषण कासलीवाल. अनिल जमगे ,डॉ. अतुल जैन यांनी उपस्थित राहण्याचं आव्हान केले आहे.''पाषाणाला परमात्मा बनवण्याचा हा अनुष्ठान केवळ जैन समाजासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त करेल,'' असा संदेश राष्ट्रसंत आचार्य देवनंदिजी महाराज यांनी दिला आहे.

# नगराध्यक्ष पतीकडून कर्मचाऱ्याला मारहाण

## पावती मागितल्याचा राग; कर्मचाऱ्याला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केल्याने पालिकेत खळबळ

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील नगरपालिकेत सत्तेची सूत्रे हाती येऊन महिनाही उलटला नाही, तोच नगराध्यक्षांच्या पतीची दादागिरी समोर आली आहे. पीटीआर विभागातील कामावरून झालेल्या वादातून नगराध्यक्षांचे पती बिलाल सहाल चाऊस यांनी पालिका कर्मचारी अक्षय धारक यांना नगरपालिकेतच बेदम मारहाण केल्याची खळबळजनक घटना दि ०५ फेब्रुवारी गुरुवार रोजी दुपारी घडली आहे.**




मागील दोन महिन्यापूर्वी येथील नगरपालिकेच्या निवडणुका होऊन महरीन शिफा बिलाल चाऊस या निवडून आल्या होत्या.त्यांनी पदभार घेऊन एक महिनाच उलटला नाही तोच नगराध्यक्षांचे पती बिलाल सहाल चाऊस यांनी नगरपालिकेतील आस्थापना विभागातील कर्मचारी अक्षय धारक यांना पीटीआर द्यायला पैसे का मागितलेस म्हणून नगरपालिकेत येत अक्षय धारक यांना खाली बोलावून त्यांच्या श्रीमुखात भडाकावली त्यानंतर त्यांच्या साथीदाराने त्यास लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. हा प्रकार चालू असताना येथे कामानिमित्त आलेल्या नागरिकांनी हे भांडण सोडवले व पुढे होणारा अनर्थ टाळला. याप्रकरणी शहर पोलिसात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. कर्मचाऱ्यास मारहाण केल्यानंतर इतर कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नगराध्यक्ष पतीची दादागिरी सहन केली जाणार नसल्याचे कर्मचाऱ्यांमधून सांगण्यात येत आहे. पुन्हा असा प्रकार झाल्यास आम्ही आंदोलन छेडणार असल्याचा इशाराकर्मचाऱ्यांनी दिला.

### पदाधिकाऱ्यांचा कर्मचाऱ्यांवर वचक नाही

नगरपालिकेतील कर्मचारी बिन बोभाट पणे पैसे मागत आहेत यावर नगराध्यक्ष , उपाध्यक्ष व निवडून आलेल्या नगरसेवकांचा वचक राहिला नाही का ? नगराध्यक्ष पतीने कर्मचाऱ्यास मारहाण केली हा प्रकार योग्य नाही व पदाधिकाऱ्यांनी अशा कर्मचाऱ्यांना नोटीस बजावणी आवश्यक होते.

-ज्ञानेश्वर मेंडके , भाजपा नेते

### नियमानुसार काम करत होतो

माझ्याकडे आस्थापना विभाग असून पीटीआर विभागातील माणूस सुट्टीवर असल्यामुळे मला त्या ठिकाणी बसवण्यात आले होते.मी संबंधितांना पीटीआर दिली व नियमानुसार शंभर रुपयाची पावती फाडण्यास सांगितले.म्हणून बिलाल चाऊस व त्याच्या साथीदारांनी मला नगरपालिकेत येऊन मला पाच-सहा चापटा मारल्या.

-अक्षय धारक,कर्मचारी न.प. माजलगाव

## मच्छिंद्रनाथ गडावर भाविकांचे दागिने लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; १५ दिवसांत दुसरी मोठी कारवाई

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील प्रसिद्ध मच्छिंद्रनाथ (मायंबा) गडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा अंभोरा पोलीस आणि बीड स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्त कारवाई करत पर्दाफाश केला आहे. विशेष म्हणजे, गेल्या १५ दिवसांत अंभोरा पोलिसांनी उघड केलेली ही दुसरी मोठी टोळी असून, यामुळे



भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

अशी होती चोरीची पद्धत, अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील ही टोळी गडावरील गर्दीचा फायदा घ्यायची. महिला भाविकांना धक्काबुक्की करणे, बोलण्यात गुंतवणे किंवा गळ्यात हात टाकून हातचलाखीने दागिने लंपास करणे, अशी यांची पद्धत होती. १९ डिसेंबर २०२५ रोजी या संदर्भात अंभोरा पोलीस ठाण्यात ◀◀ पान ३ वर

## माजलगावात गटनेत्यांच्या वादामुळे न.प. विषय समित्यांच्या निवडी पुन्हा लांबणीवर

**माजलगाव । प्रतिनिधी**

**येथील नगरपालिकेच्या विषय समित्या निवडी गटनेत्यांच्या वादामुळे होऊ शकल्या नाहीत. आठ दिवस उलटले तरी विषय समित्या निवडीबाबत तारीखच न आल्याने निवडी आणखी आठ दिवस होण्याची चिन्हे नाहीत अशी चर्चा आहे.**

येथील नगरपालिका निवडणुकीत २६ पैकी दोन्ही राष्ट्रवादीचे १०-१० नगरसेवक निवडून आले होते.बाकीचे इतर पक्ष व अपक्ष म्हणून निवडून आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे राहुल लंगडे यांना तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाकडून इम्रान खान यांना गटनेते करण्यात आले.यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे

नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे आ. प्रकाश सोळंके यांना जाऊन मिळाले होते. त्यानंतर उपाध्यक्षपदी सहाल चाऊस निवडून आले.यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते मोहन जगताप व उपाध्यक्ष सहाल चाऊस यांच्यात वाद झाला. दोघांकडे पाच पाच नगरसेवक गेल्याने दि २७ जानेवारी रोजी झालेल्या विषय समितीच्या निवडणुकीत गटनेते मोहन जगताप यांच्याकडे गेल्याने सहाल चाऊस यांच्या गटाची चांगलीच कोंडी झाली. यामुळे विषय समित्यांची निवड लांबणीवर टाकण्यात आली. लांबणीवर टाकण्यात आलेली विशेष समिती निवडणूक चार दिवसांनी होईल असे सांगितले गेले होते.परंतु आठ दिवस उलटले तरी या समितीची निवड होऊ शकली नाही. अद्यापही या निवडीची तारीख आली नसल्याचे सांगितले जाऊ लागले आहे. यामुळे या पक्षाच्या दोन्ही गटातील वातावरण पेटल्याचे दिसून येऊ लागले आहे.

## बहूचार्चित आरोग्य घोटाळ्यातील सौरभ कुलकर्णीस जामीन मंजूर

किल्ले धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील सौरभ कुलकर्णी यांच्यावर वैद्यकीय प्रवेशासाठी मदत करतो म्हणून आर्थिक फसवणूक केल्या प्रकरणी धारूर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला होता या प्रकरणी धारूर येथील प्रथम वर्ग न्यायालयात सुनावणी झाली असून आरोपीच्या वतीने अँड.राजेश नाईकवाडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला असता सौरभ कुलकर्णी यास जामीन मंजूर झाला.



वैद्यकीय पदवित्तर प्रवेशासाठी कमी पैशांमध्ये प्रवेश मिळून देतो असे म्हणत वैद्यकीय प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पैसे घेतल्या प्रकरणी धारूर तालुक्यातील सौरभ कुलकर्णी यांच्या वर धारूर पोलिस स्टेशन येथे भारतीय न्याय सहिता ३१८/४ नुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता या प्रकरणात संबंधित सौरभ कुलकर्णी यास अटक करण्यात आली होती धारूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एन.एम. वाली यांच्या न्यायालयात संबंधित प्रकरणाची सुनावणी झाली असून आरोपी सौरभ कुलकर्णी यांच्या वतीने अँड.राजेश नाईकवाडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला असून सौरभ कुलकर्णी यांची न्यायालयासमोर सक्षम बाजू मांडून अशा प्रकारची कोणतीही फसवणूक केली नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले असता संबंधित प्रकरणात न्यायालयाने सौरभ कुलकर्णी यांना जमीन मंजूर केला न्यायालयात आरोपीच्या वतीने अँड राजेश नाईकवाडे यांनी युक्तिवाद केला असून या कामी त्यांना ॲड.सुरज नखाते ,शेख शादाब यांनी सहकार्य केले.

## विठ्ठल रुक्मिणी मंदिरात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व हरिनाम सप्ताहाचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे याही वर्षी साधु संतांच्या आशीर्वादाने व माजी आ.साहेबराव दरेकर (नाना) यांच्या मार्गदर्शनाखाली व मा.आ.सुरेश धस,माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. बाळासाहेब आजबे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुर्शदपूर (गणेशनगर ) येथे दि. १५ ते २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात ह.भ.प. काशीनाथ महाराज शेंबडे (पांढरी), ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जगताप (टाकळसिंग) हे व्यासपीठ चालक म्हणून काम पाहत आहेत. या सप्ताहात काकडा, ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन, हरिपाठ, हरिकीर्तन आदि धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. या सप्ताहात ह.भ.प. दादा महाराज चांगुणे(टाकळी अमिया),ह.भ.प. संतोष महाराज मोरे (मोरेवाडी) ह.भ.प.आदिनाथ महाराज दानवे (गुरूजी),भागवताचार्य (ज्ञानाई तुकाई गुरुकुल,आष्टी, ह.भ.प.हरिभाऊ महाराज भोंदे (पिंपळगांव माळवी), भागवताचार्य ◀◀ पान ३ वर

## पंचायत समितीमध्ये घरकुलसाठी पैशाची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

गोरगरिबांचे हक्काचे घर साकारण्यासाठी असलेल्या पंतप्रधान आवास योजनेला भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याचे चित्र पाटोदा पंचायत समितीमध्ये पाहायला मिळत आहे. घरकुल योजनेचा पुढील हप्ता सोडण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून उघडपणे पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप करत, आज संतप्त लाभार्थ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यालयातच चांगलेच धारेवर धरले. यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार,

### संतप्त लाभार्थ्यांनी कर्मचाऱ्यांना झापले

तालुक्यातील अनेक लाभार्थी गेल्या काही दिवसांपासून घरकुलाच्या हप्त्यासाठी पंचायत समितीच्या चकरा मारत आहेत. घरकुलाचे काम विहित टप्प्यात पूर्ण होऊनही केवळ फाईल पुढे सरकवण्यासाठी काही कर्मचाऱ्यांकडून ठराविक रकमेची मागणी केली जात असल्याची तक्रार लाभार्थ्यांनी केली आहे. "पैसे दिले तरच हप्ता जमा होईल, अन्यथा टाळाटाळ केली जाईल," अशा शब्दांत कर्मचाऱ्यांनी अडवणूक केल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला.

कार्यालयातच संताप व्यक्त

वारंवार विनंती करूनही काम होत नसल्याने आणि उघडपणे लाच मागितली जात असल्याने लाभार्थ्यांचा संयम सुटला. आज काही लाभार्थ्यांनी थेट संबंधित कक्षात जाऊन कर्मचाऱ्यांना जाब विचारला. "आम्ही गरिबांनी पैसे आणायचे कुठून? सरकार पैसे देते तर तुम्ही का अडवता?" अशा शब्दांत लाभार्थ्यांनी कर्मचाऱ्यांना झापले. यावेळी कर्मचाऱ्यांची बोलती बंद झाली होती.

## पाणीपुरवठा स्वच्छता विभागाचे सहा महिन्यांपासून वेतन रखडले, कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

बीड । प्रतिनिधी

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांचे गेल्या सहा महिन्यापासून वेतन रखडले आहे. वेतन नियमित मिळावे याकरिता व इतर मागण्यांसाठी पाणी व स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांनी धरणे आंदोलन सुरू केले आहे. महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समिती यांच्या वतीने हे धरणे आंदोलन सुरू केले आहे.

राज्यात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील सर्वच कर्मचाऱ्यांचे सहा महिन्यांचे वेतन



रखडले असल्याने कर्मचाऱ्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे.

अनेक वेळा वारंवार मागणी करून देखील राज्यस्तरावरून निधी येवितरणासाठी वेगवेगळे अडथळे निर्माण केले जात असल्याची भावना या कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. विभागाकडे निधी उपलब्ध असताना देखील जानेपूर्वक निधी थांबवला जात असल्याचे दिसून आले आहे.

राज्यस्तरावरून झालेल्या या धोरणाच्या विरोधात राज्यातील सर्व जिल्ह्यातील कर्मचारी आंदोलनाच्या पवित्रात आले आहेत त्याचाच एक भाग म्हणून बीड जिल्ह्यातील सर्व कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत असलेल्या सर्व कामांसाठी काम बंद आंदोलन या कर्मचाऱ्यांनी सुरू केले असून तात्काळ निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी देखील या कर्मचाऱ्यांची आहे. मार्च अखेर पूर्ण करायचे उद्दिष्ट त्यासाठी लागणारे नियोजन व पुढील वर्षाचे नियोजन या सगळ्याचा परिणाम या आंदोलनामुळे होण्याची शक्यता आहे.

## आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी केली सायबर गुन्ह्याची जनजागृती

**माजलगाव । प्रतिनिधी**

राजस्थानी विद्यालयात दि.३ व ४ फेब्रुवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलन २०२५-२६ बाल महोत्सव अत्यंत आनंदोत्सवामध्ये पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, मुख्याध्यापक यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमापूजन करून झाली.




यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमाचे खूप महत्त्वाचे स्थान आहे, असे सांगितले तसेच आपल्या भाषणातून शाळेची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांमधील संस्कार, शिस्त, आत्मविश्वासाचे कौतुक केले. सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. लेझीम मनोरे, शिव तांडव,देशभक्तीपर गीत, लावणी, गोंधळ, पोवाडा यांचे सादरीकरण झाले. आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी केशव बादाडे सरांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या नाटिकेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या जनजागृतीपर नाटिकेतून ऑनलाइन गेम,ऑनलाइन रमी,ऑनलाइन कर्ज देणारी ॲप, माहिती व डेटाबेस चोरी,सायबर गुन्हेगारी,फसवे फोन कॉल, सायबर गुन्ह्याची माहिती व जनजागृती केली. तसेच आदर्श गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी गीतांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीची ओळख,देशभक्ती प्रेम,मराठी शाळा वाचवा अशा विविध भूमिकातून विद्यार्थ्यांनी आपले कला अविष्कार सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकाकडून उत्स्फूर्त टाळ्यांनी दाद दिली.या कार्यक्रमास अध्यक्षस्थानी डॉ. आर.जी.बजाज, उद्घाटक डॉ.सुरेश साबळे,प्रमुख उपस्थिती ग्रामीण कथाकार रामदीपजी डाके, सय्यद रफिक, प्रमुख उपस्थिती सौ.सोनाली अनभुले, रामानंदजी लड्डा, ओमप्रकाशजी मानधने,प्रमुख पाहुणे सौ. सुलोचना प्रधान, सौ.संगीताजी झंवर,चंद्रशेखर हाडूळे,मार्गदर्शन मुख्याध्यापक ◀◀ पान ३ वर

## आष्टी प्रीमियर लीगचा थरारक अंतिम सामना बद्रीभाऊ जगताप चॅम्पियन संघ सुपर ओव्हरमध्ये विजेता

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना अक्षरशः श्वास रोखून धरायला लावणारा ठरला. सुपर ओव्हरमध्ये नव्या पेनल्टी नियमामुळे धवलगिरी इंडियन संघाला पराभव स्वीकारावा लागला आणि बद्रीभाऊ जगताप चॅम्पियन संघाने विजेतेपदावर आपले नाव कोरले.

मराठवाडा भूषण लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित अण्णा





महोत्सव आष्टी प्रीमियर लीग स्पर्धेचा अंतिम सामना बुधवारी मोठ्या उत्साहात पार पडला. विजेत्या संघाला आमदार सुरेश आण्णा धस यांचे धाकटे चिरंजीव सागर आप्पा धस यांच्या हस्ते अण्णा महोत्सव चषक प्रदान करण्यात आला.अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करत बद्रीभाऊ जगताप चॅम्पियन संघाने ८ षटकांत दमदार खेळी करत ६१ धावांचे लक्ष्य उभे केले. प्रत्युत्तरात धवलगिरी इंडियन संघाने उत्कृष्ट फलंदाजी करत हे लक्ष्य गाठले. मात्र निर्धारित षटकांनंतर सामना बरोबरीत (टाय) सुटल्याने आयोजक समितीने सुपर ओव्हर खेळवण्याचा निर्णय घेतला.

सुपर ओव्हरमध्ये क्रिकेट विश्वातील नव्या पेनल्टी नियमामुळे धवलगिरी इंडियन संघावर नामुष्की ओढवली. पेनल्टीत मिळालेल्या एका धावेच्या फरकाने बद्रीभाऊ जगताप चॅम्पियन संघ अंतिम सामन्याचा विजेता ठरला. २६ जानेवारीपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत एकूण आठ संघांनी सहभाग नोंदवला होता. प्रथम पारितोषिक: बद्रीभाऊ जगताप चॅम्पियन ◀◀ पान ३ वर

## शब्दरुपी धन माणसाला श्रीमंती देते -डॉ. सुधाकर शेंडगे

किल्लेधारुर । प्रतिनिधी

शब्दारुपी धन माणसाला श्रीमंती देते. संत तुकाराम, संत बहीणाबाई, सावित्रीबाई फुले यांचे कार्य कर्तुत्व पाहिल्यावर याचा प्रत्यय येतो. त्यांनी जीवनाचे तत्वज्ञान सोप्या शब्दात सांगीतले. आपले भविष्य आपल्या हातात आहे असे प्रतिपादन प्रो. डॉ. सुधाकर शेंडगे यांनी केले. ते राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आयोजित विदयार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन प्लेसमेंट कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना केले. अध्यक्षीय समारोपातून डॉ. गोपाळ काकडे यांनी आजीवन शिक्षण व



विस्तार विभागाच्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. आजीवन शिक्षणामुळे आपणास मरेपर्यंत शिक्षण घेता येते. आपण आपल्या क्षमतेप्रमाणे शिक्षण घेत राहावे असे सांगीतले. यावेळी डॉ. अनंत मरकाळे यांनी लेखन व संभाषण कौशल्य या सत्राच्या समरोपातून कौशल्याची आवश्यकता समजावून सांगितली. प्रा. महादेव गायके यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर विद्यार्थ्यांना संबोधित केले. प्रा. राम नांदुरे यांनी लेखन व संभाषण ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अंजली दमानियांवर कायदेशीर कारवाई करणार, चाकणकरांचा इशारा, म्हणाल्या, त्यांची अतिशय घाणेरडी मानसिकता

**पुणे । प्रतिनिधी**

अंजली दमानिया यांना अनेक कपोलो कल्पित कथा सांगायची सवय आहे. अंजली दमानिया यांची आजची पत्रकार परिषद ऐकून समाजामध्ये किती खालच्या पातळीची विकृती असू शकते, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी टीका केली. एखाद्या व्यक्तीला आणि एका कुटुंबाला अंजली दमानिया सातत्याने बदनाम करत असतात. यापूर्वी देखील अंजली दमानिया यांनी अजित पवारांवरती अनेक आरोप केले, पण त्यातला कुठलाही आरोप त्या सिद्ध करू शकल्या नाहीत. आता त्या पार्थ पवार यांच्यावरती आरोप करत आहेत. ही अतिशय घाणेरडी मानसिकता आहे असे चाकणकर म्हणाल्या.



खरंतर या कुटुंबियांनी आपला घरातला माणूस गमावला आहे. अंजली दमानिया पुराव्या अभावी सातत्याने वक्तव्य करुन चर्चेत राहत आहेत असं मत रुपाली चाकणकर यांनी व्यक्त केले. ही अतिशय घाणेरडी मानसिकता आहे. अंजली दमानिया यांच्यावर कायदेशीर कारवाई करणार असल्याचा इशारा रुपाली चाकणकर यांनी दिला आहे.

अंजली दमानिया यांनी दुःखाच्या क्षणी केलेली विधाने अत्यंत दुर्दैवी आणि असंवेदनशील असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केले आहे. माननीय अजितदादांच्या अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हादरलेला असताना, माध्यमांशी संवाद साधताना जाणीवपूर्वक संशय निर्माण करणे हा केवळ राजकीय हेतूने प्रेरित प्रयत्न आहे. या कठीण आणि भावनिक काळात शब्दांचा विपर्यास करून वातावरण दूषित करण्याऐवजी, दुःखात सहभागी होणे अपेक्षित होते. तथ्यांशिवाय आरोप करणे हे ना माणुसकीला शोभतं, ना जबाबदार सार्वजनिक भूमिकेला. आपल्या असंवेदनशिलतेचा निषेध व धिक्कार असल्याचे अमोल मिटकरी म्हणाले. पार्थ पवार हे मुंढवा जमीन घोटाळ्यात निर्दोष असल्याचं खारगे समितीनं म्हटलं होतं. मात्र या सर्व शक्यता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी फेटाळून लावल्या आहेत. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. खारगे समितीतर्फे पार्थ पवार यांना कोणतीही क्लिन चीट मिळाली नसल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. त्या म्हणाल्या की, 'मुंढवा जमीन घोटाळ्या प्रकरणी पार्थ पवार यांना खारगे समितीनं कोणतीच क्लिन चीट दिलेली नाही. अजून समितीची शेवटची बैठक बाकी आहे. याविषयी माध्यमांमध्ये आलेल्या बातम्या धादांत खोट्या आहेत असे दमानिया यांनी म्हटलं आहे. 'पार्थ पवार यांचं नाव एफआयआरमध्ये का नाही याविषयी आमचा लढा आहे. कोणत्याही न्यायात सहानुभूतीचं कार्ड चालत नाही. हा जो घोटाळा पार्थ पवार यांनी केला आहे, त्यातून ते सुटणं शक्यच नाही. या प्रकरणाची सगळी कागदपत्रं उपलब्ध आहेत. त्यामुळे सहानुभूतीने या गोष्टी मिटणार नाहीत असे दमानिया म्हणाल्या होत्या.

# पुणे बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. काळुराम भुजबळ

पुणे । प्रतिनिधी

शहरातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या पुणे बार असोसिएशनच्या अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत ड. काळुराम ऊर्फ राम भुजबळ यांनी निर्विवाद वर्चस्व राखत विजय मिळविला. त्यांनी ३ हजार ८०७ मते मिळवित ५९७ मतांनी विजय मिळवला. शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातल झालेल्या निवडणुकीत सुमारे सात हजार पाचशे वकिलांनी मतदानाचा अधिकार बजावला. बॅलेट पेपरवर मतदान असल्याने गुरूवारी दुपारी (दि. ५) एकपर्यंत मतमोजणीचा सुरू होती.



उपाध्यक्ष पदाच्या सर्वसाधारण गटाच्या दोन जागांसाठी झालेल्या लढतीत ड. कांताराम नप्ते हे ३ हजार ६१९ मते, तर ॲड. प्रतापराव मोरे हे २ हजार ७०६ मते घेऊन विजयी झाले. तर महिला राखीव गटातून ड. प्रितीसिंह परदेशी यांनी ३ हजार ४७ मते मिळवित विजय संपादन केला. सर्वसाधारण गटातील सचिव पदाच्या दोन जागेतून ड. सम्राट जांभुळकर आणि ॲड. अभिजीत पोळ हे विजयी झाले. त्यांना अनुक्रमे ४ हजार २७२ आणि ३ हजार ३४४ मते मिळाली. महिला राखीव गटातून ड. पूजा पवार यांनी ३ हजार ८७६ मते मिळवित विजय मिळविला. खजिनदारपदासाठी झालेल्या लढतीत ड. अंजली बांदल यांनी निर्विवाद वर्चस्व राखत विजय मिळविला. त्यांना ५ हजार २७४ मते मिळाली.

हिशोब तपासणीस पदाच्या सर्वसाधारण गटातील लढतीत ॲड. शिवराज निंबाळकर ५ हजार २९० मते मिळवीत विजयी झाले. तर महिला गटातून ड. नेहा जांभळे यांनी ४ हजार ४ मते मिळवित निर्विवाद वर्चस्व राखले. तर, कार्यकारिणी सदस्यांची यापूर्वी सर्वानुमती निवड झाली आहे.

सर्वसाधारण गटातून मयुर मराठे, विकास जाधव, उमेश मांजरे, प्रितेश दळवी, योगेश जैन, अनिल हुडे, अमोल वडगणे, उदय शेलार प्रज्वल गुंजाळ आणि आकाश भिलारे यांची निवड झाली आहे. तर, महिला राखीव गटातून संध्या रायबोले, शितल देशमुख, गुंजन भोसले, स्मिता वाघमारे आणि प्रियंका घाडगे यांची यापुर्वीच सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. निवडणुकीसाठी मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ड. प्रताप परदेशी यांनी काम पाहिले.

# शेतकरी कर्जमाफीसाठी उच्चाधिकार समिती सक्रिय; बँकांकडून माहिती संकलन सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील महायुती सरकारच्या शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्याबाबतच्या निर्णयात गठित करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीने कामकाज सुरू करून बैठका घेण्यात येत आहेत. त्यातील निर्णयानुसार बँकांकडून थकीत कर्जाची तसेच नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्याबाबतचा निर्णय झालेला असून, त्यादृष्टीने योग्य त्या सूचना क्षेत्रीय स्तरावर देण्यात आल्याचे सहकार विभागाच्या मंत्रालयीन सूत्रांकडून सांगण्यात आले. ज्यामुळे राज्याच्या आगामी अर्थसंकल्पापूर्वीच कर्जमाफीचे नेमके चित्र व आकड्यांवर निश्चितता करण्यासाठी पावले उचलण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.**

राज्य सरकारच्या कर्जमाफीबाबतच्या दि. ३० ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयाद्वारे राज्यामध्ये शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून त्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरूपी सोडवणूक करण्यास शासनाने प्राधान्य दिले आहे. त्यासाठी शासनास शिफारस करण्याच्या हेतूने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आर्थिक सल्लागार तथा मित्र या संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकारी समिती गठित केली आहे.





या उच्चाधिकार समितीच्या दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या बैठकीमध्ये बँकांकडून थकीत कर्जाची तसेच नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्याबाबतचा निर्णय झाल्याचेही सूत्रांनी सांगितले. त्यानुसार बँकांकडून माहिती प्राप्त करून घेण्यात येत आहे. या कामकाजाकरिता प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाआयटी-मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीच्या कामकाजाच्या अनुषंगाने राज्यातील खासगी व सहकारी साखर कारखान्यांमार्फत शेतकऱ्यांना ऊस देयकापोटी देण्यात आलेल्या रकमांचा तपशील उपलब्ध करून देण्याबाबत समितीच्या दि. ६ जानेवारी २०२६ रोजीच्या बैठकीत निर्देश देण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. मागील दोन ऊस गाळप हंगामामध्ये कारखान्यांनी शेतकऱ्यांना दिलेल्या रकमांचा तपशीलही मागवला आहे.

# मावळ तालुक्यात ७ फेब्रुवारीला मतदान; २४३ केंद्रांवर २.३१ लाख मतदार

वडगाव मावळ । प्रतिनिधी

मावळ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ५ व पंचायत समितीच्या १० जागांसाठी ७ फेबुवारी रोजी मतदान होणार आहे. यासाठी तालुक्यात एकूण २४३ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार असून, २ लाख ३१६ मतदारसंख्या असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी सुरेंद्र नवले यांनी दिली.

शनिवारी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानंतर सोमवारी (दि. ९) मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व कायदेशीर पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून सर्व तयारी करण्यात आली असल्याचेही नवले यांनी सांगितले. मावळ तालुक्यात एकूण २ लाख ३१६ मतदार असून, यामध्ये १ लाख २ हजार ८२ पुरुष, ९८ हजार २२६



महिला आणि आठ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. तसेच सोमाटणे-चांदखेड जिल्हा परिषद गटामध्ये सर्वाधिक ४५ हजार ७७५ इतकी मतदार संख्या आहे. तर, काले पंचायत समिती गणामध्ये सर्वाधिक २४ हजार १९९ इतकी मतदार संख्या आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या नवीन कार्यक्रम बदलानुसार ५ फेबुवारी रात्री १० वाजता प्रचार बंद झाला आहे. त्यामुळे प्रचाराचा शेवटचा दिवस जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी महत्वाचा ठरणार आहे. त्यादृष्टीने सर्वच पक्ष व उमेदवारांनी प्रचाराचे नियोजन केले आहे.

मावळ तालुक्याचे मुख्यालय असलेल्या वडगाव मावळ येथील तहसील कार्यालयातून तालुक्यातील सर्व २४३ मतदान केंद्रांवर मतपेट्या, मतदान साहित्यांसह मतदार कर्मचारी रवाना होणार आहेत. मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडेल, असा विश्वास निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र नवले यांनी व्यक्त केला.

# एकरला १ कोटीपेक्षा जास्त दर? पुरंदर विमानतळाच्या निधीचा आकडा वाढला

पुणे । प्रतिनिधी

पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी आवश्यक असणारा निधी उभारण्यासाठी कर्ज घेण्यात येणार आहे. त्याचा सविस्तर प्रस्ताव पुढील आठवड्यात होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना दिले आहेत.



पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये हे विमानतळ होणार असून, यासाठी सुमारे ३ हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. यासाठी प्रतिएकरी एक कोटी रुपयांहून अधिक दर देण्याचे ठरले असून, चार पट मोबदला व दहा टक्के जमीन परतावा देण्याचे राज्य सरकारने यापूर्वीच मान्य केले आहे. गेल्या महिन्यात जमिनीचा एकरी दर, तसेच परताव्यापोटी देण्यात येणारे दहा टक्क्यांऐवजी वाढीव जमीन देण्यास राज्य सरकार तयार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांची बोलताना स्पष्ट केले होते. त्यामुळे या भूसंपादनासाठी जिल्हा प्रशासनाने पूर्वी ५ हजार कोटी रुपयांचा निधी लागेल, असा प्रस्ताव राज्य सरकार दिला होता. त्यानंतर या घोषणेनंतर आता हा खर्च एक हजार कोटी रुपयांनी वाढून ६ हजार कोटी रुपये झाला आहे. यासाठी राज्य सरकारने कर्ज उभारण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील प्रस्ताव राज्य मंत्रिमंडळाने मान्य केल्यानंतर हुडकोकडे पाठविण्यात येणार आहे.

# विधीसंघर्षीत बालकाकडून गावठी कट्टा जप्त; भारती विद्यापीठ पोलिसांची कारवाई

पुणे । प्रतिनिधक्ष

भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी केलेल्या पेट्रोलिंगदरम्यान एका विधीसंघर्षीत बालकाकडून गावठी बनावटीचा कट्टा (पिस्तूल) जप्त करण्यात आला असून या प्रकरणी त्याच्यासह आणखी एका साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी व पथक बुधवारी पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी अंमलदार मितेश चोरमोले, सागर बोरगे आणि अभिनय चौधरी यांना खबर मिळाली की, एक विधीसंघर्षीत बालक नवले पूलाकडून कात्रजकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगत, राधाकृष्ण गार्डनसमोरील सेवा रस्त्यावर संशयास्पदरीत्या थांबलेला आहे.



मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ त्या ठिकाणी जाऊन विधीसंघर्षीत बालकाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे ५० हजार रुपये किंमतीचा गावठी बनावटीचा कट्टा जप्त करण्यात आला. प्राथमिक चौकशीत हा कट्टा त्याचा साथीदार सोमनाथ चांदणे याने दिल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी करत आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा , अपर पोलीस आयुक्त (पश्चिम) राजेश बनसोडे उपआयुक्त (परिमंडळ २) मिलिंद मोहीते, सहाय्यक आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे, उपनिरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार मितेश चोरमोले, अभिनय चौधरी, सागर बोरगे, सचिन सरपाले, महेश बारवकर, मंगेश पवार, निलेश खैरमोडे, मंगेश गायकवाड, किरण साबळे, तुकाराम सुतार, संदीप आगळे यांनी सहभाग घेतला.

# स्थायी समिती अध्यक्षपदासाठी चुरस; शिळीमकर, टिंगरे, भिमाले चर्चेत

पुणे । प्रतिनिधी

महापौर व उपमहापौर उमेदवारनिश्चितीनंतर आता महापालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. या पदासाठी आता इच्छुकांनी जोरदार फिल्डिंग लावली असून, ज्येष्ठ नगरसेवक राजेंद्र शिळीमकर, अनिल टिंगरे, श्रीनाथ भिमाले यांची नावे स्पर्धेत आहेत.



महापालिकेचे सर्व आर्थिक निर्णय स्थायी समितीच्या माध्यमातून होत असल्याने या समितीचे अध्यक्षपद अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. महापौर आणि उपमहापौर निवडीनंतर स्थायी समितीसह अन्य समित्यांच्या अध्यक्षपदाच्या निवडणुका होणार आहेत. भाजपकडे स्पष्ट बहुमत असल्याने अध्यक्षपद भाजपकडेच राहणार असल्याचे स्पष्ट आहे. त्यानुसार भाजपमधील इच्छुकांनी स्थायीच्या अध्यक्षपदासाठी आत्तापासून फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. महापौरपदाच्या उमेदवार मंजूषा नागपुरे यांच्या रूपाने खडकवासला मतदारसंघाला, तर उपमहापौरपदाच्या उमेदवारीने शिवाजीनगर मतदारसंघाला प्रतिनिधित्व मिळाले आहे. तर, कसबा पेठ आणि पुणे कॅन्टोन्मेंट अशा दोन मतदारसंघांत विभागलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या गणेश बिडकर यांना सभागृह नेतेपदाची संधी मिळाली आहे. त्यामुळे आता उर्वरित मतदारसंघांतील इच्छुकांना स्थायी समिती अध्यक्षपदाची संधी मिळेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामध्ये पर्वतीमधून राजेंद्र शिळीमकर व श्रीनाथ भिमाले, तर वडगाव शेरी मतदारसंघातून अनिल टिंगरे यांची नावे चर्चेत आहेत.

स्थायी समिती अध्यक्षपद निवडताना जातीय समीकरणे महत्त्वाची ठरणार आहेत. महापौर व सभागृहनेतेपद ओबीसी वर्गाकडे, तर उपमहापौरपद अनुसूचित जाती प्रवर्गाकडे गेले आहे. त्यामुळे आता स्थायी समितीसाठी मराठा चेहऱ्याला संधी दिली जाऊ शकते. त्यामुळे शिळीमकर व टिंगरे यांच्यातच अध्यक्षपदाची चुरस होण्याची शक्यता आहे.

# वाहतूक ठप्प असतानाही टोलवसुली केल्याने संताप; अखेर सरकारने घेतला 'हा' निर्णय

पुणे । प्रतिनिधी

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील खोपोली टोल नाक्याजवळ केमिकल वाहून नेणाऱ्या टँकरचा अपघात झाल्यामुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर गेल्या २४ तासांपासून वाहतूक ठप्प झाली आहे. अशाही स्थितीत प्रवाशांकडून टोलवसुली केली जात असल्याने लोकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

मंगळवारी (दि. ३) सायंकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर आडोशी बोगद्याजवळ एक केमिकल वाहून नेणारा टँकर पलटी झाला. त्यामुळे मुंबईकडे जाणारी वाहतूक, जुना मुंबई-पुणे हायवे जॅम झाला. या गोष्टीला



जवळपास २२ तास झाले उलटले, तरी तो टँकर बाजूला काढण्यामध्ये प्रशासनाला अपयश आले आहे.

या हायवेवर टँकर पलटी झाला असतानाही या ठिकाणी वाहने सोडण्यात आल्याने या महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. महत्त्वाचे म्हणजे या महामार्गावर वाहतूक कोंडी झाल्याची सूचना प्रशासनाने दिली नाही. त्यामुळेच अनेक प्रवाशांवर या ठिकाणी गेल्या २२ तासांपासून ट्रॅफिकमध्ये अडकण्याची वेळ आली.

तासनतास ट्रॅफिकमध्ये अडकलेल्या प्रवाशांना प्रशासनाकडून पिण्याच्या पाण्याची देखील सोय करण्यात आलेली नाही. मात्र, अशाही परिस्थितीत या महामार्गावर टोलवसुली केली जात असल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला. याप्रश्नी माध्यमांनी आवाज उठविल्यानंतर सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी सांगितले की, तूर्तास हा मार्ग मोकळा करण्यासाठी प्राथमिकता आहे. ही घटना आज घडली आहे ती चुकीची असून त्यावर लवकरात लवकर तोडगा काढणार आहे. यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यावरही भर देणार आहोत. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बोलणे झाले आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर झालेल्या वाहतूक कोंडीनंतर त्या ठिकाणी टोल वसुली न करण्याच्या टोलचालकांना दिल्या आहेत.